३ ला प्रश्न
औपमन्यव: प्राचीनशाल:
द्युलोक-उपासना

– द्वादश खंड – (१२)

औपमन्यव: कं त्वम् आत्मानम् उपास्से? इति प्राचीनशाल: औपमन्यव: प्रत्युवाच – भगव: दिवम् एव राजन्! इति ह उवाच। त्वं यम् आत्मानम् उपास्से एष: सुतेजा: आत्मा वैश्वानर:। तस्मात् तव कुले असुतं सुतं आसुतं दृश्यते॥१॥

कैकेय अश्वपतीने उपदेश केला नाही. तर प्रत्येकाची चौकशी करून त्यांची स्थिती जाणून घेतली. ही सर्व मंडळी जरी विद्वान असली तरी उपासनेमध्ये भेद असू शकतात. व उपदेश हा अधिकारानुसार करायचा असतो.

राजाने उपमन्युच्या पुत्राला प्राचीनशालाला विचारले, "तू कोणत्या आत्म्याची उपासना करतोस?" "मी द्युलोकाची वैश्वानर म्हणून उपासना करतो."

'बरोबर आहे. म्हणूनच तुझ्या कुलात अहर्गण (एक दिवसाच्या ज्योतिष्टोम यज्ञ) आदीमध्ये सुत (इथे पुत्र असा अर्थ नसून सवन केलेला म्हणजे अभिषुत (काढलेला) सोमरूप कर्तव्य प्रसुत पद्धतीने काढलेला सोमरस अधिक दृष्टीला पडतो. म्हणूनच तुझ्या वंशात कर्मनिष्ठा अधिक आहे.

अत्सि अन्नं पश्यसि प्रियम्। य: तम् एवम् आत्मानं वैश्वानरं उपास्ते स: अन्नम् अत्ति प्रियं पश्यति। अस्य कुले ब्रह्मवर्चसं भवति। तु एष: आत्मन: मूर्धा इति। यत् मां न आगमिष्य: ते मूर्धा व्यपतिष्यत् इति ह उवाच॥२॥

या मूर्धा असलेल्या वैश्वानराची उपासना केल्यामुळे तुला उत्तम खायला प्यायला मिळते. अशा उपासकाच्या कुळातील लोक तेजस्वी होतात. परंतु ही उपासना म्हणजे वैश्वानराचे केवळ मस्तक आहे. संपूर्ण वैश्वानर नाही. तू माझ्याकडे आलास हे बरे झाले नाहीतर तसे मस्तक (अर्धवट उपासना केल्याने) तुटून पडले असते

With Best Compliments From
MANIAR METALS
FOR EVERYTHING IN FERROUS & NON-FERROUS METALS
894, Shukrawar Peth, Shahu Chowk, Pune - 411 002.
Tel.: 24475843, 24470382 Fax : 24473188
E-mail : hjmaniar@vsnl.net
Dealers In : Copper, Stainless Steel, Phosphorus Bronze, Gunmetals in forms of Sheets, Coils, Rods, Flats, Tubes & Extrusion Sections.
Speciality In : Aluminium Ingots, Alloy Ingots, Aluminium Hot & Cold Rolled Products, Aluminium Extrusion Sections.

AUGUST
9
FRIDAY

श्रावण शु. ३ संवत २०६९
शुक्रवार ९/८/२०१३

रमजान ईद

JULY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

## - त्रयोदश खण्ड - (१३)

अथ ह उवाच सत्ययज्ञं पौलुषिं प्राचीनयोग्य कं त्वम् आत्मानम् उपास्से इति आदित्यमेव भगवो राजन् इति ह उवाच एष वै विश्वरूप आत्मा वैश्वानरो यं त्वम् आत्मानम् उपास्से तस्मात् तव बहु विश्वरूपं कुले दृश्यते ॥१॥

मग राजाने पुलुषाचा पुत्र सत्ययज्ञाला विचारले, "तू कोणत्या आत्म्याची उपासना करतोस?" तेव्हा तो म्हणाला, "राजन मी (आत्मा म्हणून) आदित्याची उपासना करतो" तेव्हा राजा त्याला म्हणाला, "अरे तू ज्याची उपासना करतोस तो विश्वरूप वैश्वानर आत्मा आहे आणि म्हणूनच तुझ्या कुळात खूपशी विश्वरूप साधने दिसून येतात.

प्रवृत्तोऽश्वतरीरथो दासीनिष्कोऽत्स्यन्नं पश्यसि प्रियम् अत्ति अन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एवमात्मानं वैश्वानरमुपास्ते चक्षुष्ट्वेतदात्मन इति होवाचान्धोऽभविष्यो यन्मां नागमिष्य इति ॥२॥

वैश्वानराची अशा प्रकारे उपासना करणाऱ्या तुला पाहून, तुझ्या मागून प्रवृत्त झालेला खेचरांनी ओढला जाणारा रथ, दासी, सोन्याचा हार मला दिसतो आहे. तू अन्न भक्षण करतोस, प्रिय पाहतोस. वैश्वानर आत्म्याची उपासना करणाऱ्यांना खायला भरपूर अन्न मिळते. डोळ्यांना प्रिय दिसते. त्याच्या कुळातील लोक तेजस्वी असतात.

परंतु ही उपासना म्हणजे वैश्वानर आत्म्याचा डोळा आहे. केवळ याच्या उपासनेने तू आंधळा झाला असतास. बरं झालं तू माझ्याकडे आलास ते!

© www.madhaveer.com

With Best Compliments From
Water Suppliers

SEPTEMBER 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

खंड ३ ते १०

श्रावण शु. ३ संवत २०६९
शनिवार १०/८/२०१३

AUGUST
10
SATURDAY

स्तेनो हिरण्यस्य ------ एते पतन्ति चत्वारः पंचमश्च आचरन् तैः इति॥
।।छां.५.१०.९।।

विज्ञान असे सांगते की दृश्य सृष्टीत कोणतेही कर्म घडले तर त्याची प्रतिक्रिया जगावर उमटते. आपण साधे बोललो तरी त्यामुळे निर्माण होणाऱ्या वायुलहरी सूक्ष्मरूपाने सर्व जगात पसरतात. हा कर्माचा नियम मानसिक व नैतिक क्षेत्रामध्ये सुद्धा तितकाच लागू पडतो. प्रत्येक जीवाला स्वतःचा इतिहास असतो. त्याने केलेल्या प्रत्येक शारीरिक व मानसिक कर्माचा परिणाम सूक्ष्मरूपाने सूक्ष्मदेहामध्ये साठवला जातो. या कर्मसंस्कारांच्या साठ्याला संचित अदृष्ट म्हणतात. संचित कर्माचे परिणाम सारखे असतात - शुभ, अशुभ, मिश्र --- या संचित कर्मांपैकी फळ भोगण्यासाठी पक्व झालेल्या कर्मांना प्रारब्ध म्हणतात. या आयुष्यातील जन्म, मृत्यु, आजारपण, सुख-दुःख, नातेवाईक या सर्व गोष्टी प्रारब्धाधीन असतात. व ते भोगल्यावाचून मुक्ती मिळत नाही. हातातून बाण सुटला की तो मागे घेता येत नाही. तो आपल्या गतीने त्या त्या स्थळी जाऊन पडतो. त्याप्रमाणे सुख दुःखे प्रारब्धगतीने भोगावी लागतात.

SUNDAY, AUGUST 11 नागपंचमी श्रावण शु. ४ संवत २०६९

परंतु वाईट कर्म टाळून चांगली कर्मे करण्याचे स्वातंत्र्य माणसाला असतेच. तेव्हा [illegible]ची कर्मे उत्तम केली तर मृत्युनंतर चांगली गति मिळेल. तेव्हा दुष्कर्माकडे वळणारे आपले मन आवरून पुण्यमार्गावर चालण्याचा सराव करावा. पुण्यमार्गाने चालल्याशिवाय कधीही आत्मज्ञानाची साधना करता येणार नाही. अशी जन्मोजन्मी पुण्यकर्मे करून साधना चालू ठेवली तर भगवंताची कृपा निश्चित होते असा साधुसंतांचा अनुभव आहे. आणि एकदा पुण्यमार्गाची चटक लागली की हळूहळू प्रगति होत माणूस थेट आत्मदर्शनापर्यंत पोहोचतो.

With Best Compliments From

खंड ३३ ते २४

| JULY 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

राजा अश्वपतिने एक अत्यंत महत्वाचे तत्व सांगितले — पिंडामधील शुद्ध मीपणाने रहाणारा आत्मा आणि ब्रह्मांडाला व्यापून असणारा परमात्मा दोन्ही एकरूपच आहेत.

आदित्य, वायु, इ० ची (सगुणाची) उपासना सगुण समजून केली तर ती योग्य मार्गाला नेते. परंतु तेच सर्वस्व नाही हत्तीच्या एका भागाला स्पर्श करून त्यालाच संपूर्ण हत्ती मानण्यासारखे आहे. भिंत, खांब, दोरी, सूप, खुंटी - - - -

सगुणाची उपासना करता करता आपले उपास्यदेवत सर्व ठिकाणी व्यापून राहिले आहे अशी धारणा व्हायला हवी; नाहीतर मग साधकाच्या ठिकाणी सांप्रदायिकता / संकुचितपण येत जातो व त्यामुळे उपासनेचा मूळ हेतु साध्य होत नाही.

आपल्या देवतावर निष्ठा असावी: व इतर देवतांविषयी आदर असावा. सगुणाची उपासना धारणाशक्ति वाढवून शरणागति शिकवते व शरणागताला आत्मदर्शन घडते.

X

आपण रोज जे अन्न खातो ते खाताना मनाने अंतरात्म्याला अर्पण करून मग खावे. आत्मस्वरूप चैतन्याचे पाच दृश्य आविष्कार म्हणजे प्राण, अपान, व्यान, उदान, समान! अन्न सेवन करताना प्रत्येक घासाघासाला भगवद्चिंतन घडले तर त्या साधकाची बुद्धि आपोआप शुद्ध होत जाते. त्यामुळेच रोजचे भोजन मनाने भगवंताला अर्पण केल्याशिवाय खाऊ नये.

त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुष, थोर महात्मे, संत यांचे उच्छिष्ट खावे किंवा त्यांच्याकडून मिळालेले अन्न प्रसाद म्हणून सेवन करावे. त्यांचा स्पर्श हा अमृतस्पर्श असल्याने त्यांच्या घरचे शुद्ध अन्न त्यांच्या हातून मुद्दाम मागून घ्यावे. त्यातूनही शिष्याची शक्ती जागृत होते अशी काही संप्रदायांची श्रद्धा आहे.

© www.nadiguruveer.com

इंद्रद्युम्न भाल्लवेय - वैश्वानर उपासना
प्राण-उत्क्रमण



(१४)

॥ चतुर्दश खण्ड ॥

अथ ह उवाच इन्द्रद्युम्नं भाल्लवेयं (राजा) उवाच - हे वैयाघ्रपद्य, त्वं कम् आत्मानम् उपास्से इति। स उवाच - वायुम् एव भगवः राजन् इति। स ह उवाच एष वै पृथग्वर्त्मात्मा वैश्वानरः यं त्वम् आत्मानम् उपास्से। तस्मात् त्वां पृथग्बलयः आयन्ति पृथग्रथश्रेणयः अनुयान्ति ॥१॥

मग राजाने भाल्लवेय इंद्रद्युम्नाला उपासनेबद्दल विचारताच त्याने वायुच्या उपासनेबद्दल सांगितले. तेव्हा राजा म्हणाला की हा तर भिन्न भिन्न मार्गांनी जाणारा वैश्वानर आहे. आणि त्यामुळेच तर तुझ्याकडे वेगवेगळ्या ठिकाणांहून विविध उपहार भेट म्हणून येत असतात आणि तुझ्या पाठी तर एका एका रथांच्या ओळी लागलेल्या असतात.

अत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्त्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते प्राणस्त्वेष आत्मन इति होवाच प्राणस्त उदक्रमिष्यद्यन्मां नागमिष्य इति ॥
(न आगमिष्य)

तुला खाण्यासाठी भरपूर अन्न मिळते. तुझ्या नजरेला आवडत्या प्रिय गोष्टी पडतात. अशा प्रकारे वैश्वानर आत्म्याची उपासना करणाऱ्याला खायला भरपूर मिळते. प्रिय व अनुकूल पहायला मिळते. त्याच्या कुळातील लोक तेजस्वी होतात. हे जरी खरे असले तरी तू जी उपासना करतो आहेस, तो संपूर्ण वैश्वानर नाही, तर वैश्वानराचा प्राण आहे. आणि राजा पुढे म्हणाला, बरं झाले तू माझ्याकडे आला नाही तर तुझ्या प्राणांचे उत्क्रमण झाले असते.

© www.madhaveeraghuveer.com

शार्कराक्ष्य - आकाश - मध्यभाग Affected
बुडिल - जल / आप - मूत्राशय



PF Payment

| JULY 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

— पञ्चदश खंड — (१५)

अथ हउवाच जनं शार्कराक्ष्य ------- प्रजयाच धनेन च ...
अत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्त्यन्नं ------- यशीर्षयन्मां नागमिष्य इति

शार्कराक्ष्य आकाशाची पूजा (आत्मा मानून) करत होता. राजा म्हणाले आकाश हा वैश्वानराचा बहुल आत्मा आहे. तू त्याची पूजा करत असल्याने तुझ्याकडे मनुष्यबळ व धनसंपत्ति भरपूर आहे.
त्यामुळेच तुला भरपूर अन्न मिळते. प्रिय / अनुकूल पाहता येते त्याच्या कुळातील लोक तेजस्वी होतात. परंतु तू ज्या आत्म्याची उपासना करतोस, तो वैश्वानराचा मध्यभाग आहे. तू माझ्याकडे आला नसतास तर तुझा मध्यभाग विशीर्ण झाला असता बरं झाले तू माझ्याकडे आलास!

— षोडश: खंड — (१६)

अथ हउवाच बुडिलमाश्वतराश्विं वैयाघ्रपद्य कं त्वमात्मानं उपास्से ------ वैश्वानरो ------ रयिमासुपुष्टिमान् ||

मग राजा अश्वपति-अश्वतराश्वाच्या पुत्राने बुडिलाला विचारले तू कोणत्या आत्म्याची उपासना करतोस? आपाची / जलाची / अरे तो (आप) तर वैश्वानराचा रयि आत्मा आहे. त्यामुळेच तू धनवान / पुष्टिवान आहेस. (सुदृढ शरीराचा आहेस.

अत्स्यन्नं पश्यसि प्रियं पश्यत्यत्ति ------ वैश्वानरमुपास्ते
--- [illegible] --- ब्रह्मवर्चसं भवति ... बस्तिस्ते व्यभेत्स्यत् ...

जो अशा प्रकारे वैश्वानर आत्म्याची उपासना करतो त्याला खायला प्यायला भरपूर मिळते. चांगले चांगले पहायला मिळते. ब्रह्मतेजाने असणारे लोक त्याच्या कुळात निपजतात. पण आप हे आत्म्याचे मूत्राशय आहे. तू माझ्याकडे आला नसतास तर तुझे मूत्राशय विदीर्ण झाले असते.

With Best Compliments From Jayantilal Soni
© www.madhaveeraghuveer.com

उद्दालक आरुणि (गौतम) - पृथ्वी उपासना
आधार - पाय



- सप्तदश खण्ड - (१७)

अथ ह उद्दालकम् आरुणिं गौतम --- कम् त्वम्? --- पृथिवीम् एव ----- प्रतिष्ठात्मा वैश्वानरो ----- प्रजया च पशुभिश्च ॥१॥

राजाने विचारल्यावर गौतमाने पृथ्वीची उपासना करत असल्याचे सांगितले. त्यावर राजा म्हणाला. पृथ्वी हा वैश्वानर आत्म्याचा आधार आहे आणि म्हणूनच तू प्रजा व पशुंमुळे प्रतिष्ठित आहेस.

अत्स्यन्नं पश्यसि ---- ब्रह्मवर्चसं --- वैश्वानरमुपास्ते --- पादौ त्वेतात्मन ---- पादौ ते व्यम्लास्येतां यन्मां नागमिष्य इति ॥

वैश्वानर आत्म्याची उपासना करत असल्याने तुला खायला, प्यायला अन्नोत्तम मिळते. कुळात ब्रह्मतेज राहते. पण ही पृथ्वीची उपासना आहे. तू माझ्याकडे आला नसतास तर तुझे पाय पंगू झाले असते

- अष्टदश खण्ड - (१८)

तान् होवाच एते वै खलु यूयं पृथक् इव इमम् आत्मानम् वैश्वानरं विद्वांस: अन्नम् अत्थ तु य: एतम् एवं प्रादेशमात्रम् अभिविमानं आत्मानं वैश्वानरम् उपास्ते स: सर्वेषु लोकेषु सर्वेषु भूतेषु सर्वेषु आत्मसु अन्नम् अत्ति ॥१॥

राजा त्या सर्वांना म्हणाला तुम्ही या आत्म्याला तुकड्यातुकड्याने जाणून अन्न भक्षण करता. जो कोणी 'हाच मी' अशा अभिमानाचा विषय होणाऱ्या वैश्वानराची उपासना करतो त्याला सर्व लाभते. तो सर्व लोकांमध्ये, सर्व भूतांमध्ये व सर्व आत्म्यांमध्ये राहून अन्न खातो.

With Best Compliments from
प्रॉपर्टी तुमची...
प्रमोद वास्तुनिर्मिती
▶ गुंठेवारी
▶ सरकारी मोजणी
▶ प्लॅन मंजुरी
▶ लेआऊट मंजुरी
▶ एन. ऐ. ऑर्डर
▶ प्रॉपर्टी कन्सल्टंट
▶ बिल्डिंग कन्स्ट्रक्शन्स
▶ खाजगी मोजणी

| | | | |
|---|---|---|---|
| प्राचीनशाल औपमन्यव: | — | द्युलोक | मस्तक |
| सत्ययज्ञ - पौलुषिपुत्र | — | वैश्वानरो | चक्षु |
| इंद्रद्युम्न भाल्लवेय | — | वायु | प्राण |
| जन शार्कराक्ष्य | — | आकाश | मध्यभाग |
| बुडिल | — | जल / आप | मूत्राशय |
| उद्दालक | — | पृथ्वी | पाय |

त्या सहा जणांना राजा म्हणाला, एक गोष्ट लक्षात घ्या की वैश्वानर आणि आपण भिन्न नाही. दोघे एकच आहोत. आपल्याकडून त्याला वेगळे मानून आणि त्याच्या एकेका भागाची उपासना करणे काही योग्य नाही.

हत्ती आणि आंधळ्यांच्या कथेप्रमाणे एक भाग जाणून (पाठ, कान, शेपूट, दात, पाय) त्याला पूर्णपणे जाणता येत नाही. तसेच तो वैश्वानर अपरिच्छिन्न आहे. त्याला सीमित समजणे हे अज्ञान आहे. तो विश्वभर पसरलेला आहे. तो तुमच्या माझ्यामध्ये ह्याच्या त्याच्यात सर्वत्र भरलेला आहे. म्हणूनच त्याला सर्वांचे जाणणारा सर्वात्मा होतो.

तस्य ह वा एतस्यात्मनो वैश्वानरस्य मूर्धैव सुतेजा: चक्षु: विश्वरूप: प्राण: पृथग्वर्त्मात्मा संदेहो बहुलो बस्ति: एव रयि: पृथिवी एव पादौ उर: एव वेदि: लोमानि बर्हि: हृदयं गार्हपत्य: मन: अन्वाहार्यपचन: आस्यम् आहवनीय: ॥२॥

पुरुषसूक्तामध्ये विराट पुरुषाचे वर्णन अशाच प्रकारचे आहे तो विश्वरूपाने विराट वैश्वानर सर्वत्र पसरला आहे. आपण सगळे देखील त्यातच आहोत. अशा त्या विराटाची उपासना करायला हवी. समग्रतेने विचार व्हायला हवा.

| | | |
|---|---|---|
| द्युलोक | सतेजा | मस्तक |
| पृथग्वर्त्मात्मा | भिन्न मार्गाने जाणारा | प्राण |
| विश्वरूप | आदित्य | चक्षु |
| सन्देह: | बहुल: | मध्यभाग |
| बस्ति | रयि | मूत्राशय |
| पृथिवी | आधार | पाद |
| वेदि | यज्ञकुंड | उर |
| लोमानि | | बर्हि: (कुश, लव) |
| गार्हपत्य | | हृदय |
| अन्वाहार्यपचन | | मन |
| आहवनीय | | आस्यम् (मुख) |

त्रिसुपर्ण स्तोत्रात देखील वक्षस्थलाला वेदि मानून त्यावरील केस म्हणजे दर्भ वा कुश असे वर्णन आले आहे. थोडक्यात काय तर संपूर्ण जीवनच हा एक यज्ञ आहे असे मानून जर कर्मे केली तर ती बाधक ठरत नाहीत. त्यांचा लेप लागत नाही. ती आहुति म्हणून यज्ञात विलीन होऊन जातात.
यज्ञायाचरत: कर्म ----- । यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र ----



१९

एकोनविंश खण्ड

तद् यद् भक्तं प्रथमं आगच्छेत् तत् होमीयं स यां प्रथमां आहुतिं जुहुयात् तां जुहुयात् प्राणाय स्वाहा इति प्राणस्तृप्यति

भोजनासाठी जेव्हा अन्न समोर येते तेव्हा त्या अन्नाचे हवन करायचे असते. त्यावेळी आहुती देताना प्रथम प्राणाय स्वाहा या मंत्राने द्यावी. त्यामुळे प्राण तृप्त होतात.

© www.madhaveeraghuveer.com

## सति सप्तमीचा प्रयोग



प्राणे तृप्यति चक्षुस्तृप्यति चक्षुषि तृप्यति आदित्यः तृप्यति आदित्ये तृप्यति द्यौः तृप्यति दिवि तृप्यन्त्यां यत् किञ्च द्यौः च आदित्यः च अधितिष्ठतः तत् तृप्यति तस्य अनुतृप्तिं प्रजया पशुभिः अन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति ॥२॥

प्राण तृप्त झाला की चक्षु तृप्त होतो. चक्षु तृप्त झाला की आदित्य तृप्त होतो. आदित्य तृप्त झाला की द्युलोक तृप्त होतो. द्युलोक तृप्त झाला की त्याचे व आदित्याचे अधिष्ठान तृप्त होते. व त्यातून त्याला स्वतःला (भोक्त्याला) म्हणजेच अन्न खाणाऱ्याला प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज, ब्रह्मवर्चस प्राप्त होते.

### विंश खण्ड:

अथ यां द्वितीयां जुहुयात् 'व्यानाय स्वाहा' इति व्यानः तृप्यति ॥१॥ व्याने तृप्यति श्रोत्रं तृप्यति श्रोत्रे तृप्यति चन्द्रमाः तृप्यति चन्द्रमसि तृप्यति दिशः तृप्यन्ति दिक्षु तृप्यन्तीषु यत्किञ्च दिशश्च चन्द्रमाश्च आधितिष्ठन्ति तत् तृप्यति तस्यानु तृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिः अन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति ॥२॥

मग जी दुसरी आहुति द्यायची ती 'व्यानाय स्वाहा' असे म्हणून द्यावी. त्याने व्यान तृप्त होतो. व्यान तृप्त झाला की कान तृप्त होतात. कान तृप्त झाले की चंद्रमा तृप्त होतो. चंद्रमा तृप्त झाला की दिशा तृप्त होतात. दिशा तृप्त झाल्या की ज्या कशावर चंद्रमा व दिशा अधिष्ठित आहेत ते तृप्त होते. आणि त्याच्या तृप्तीनंतर भोक्ता (अन्नसेवन करणारा) तृप्त होतो. व त्याला प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस प्राप्त होते.

- एकविंश खण्ड -

अथ यां तृतीयां जुहुयात् तां जुहुयात् 'अपानाय स्वाहा' इति अपानः तृप्यति । अपाने तृप्यति वाक् तृप्यति वाचि तृप्यन्त्याम् अग्निः तृप्यति । अग्नौ तृप्यति पृथिवी तृप्यति, पृथिव्यां तृप्यन्त्यां यत्किंच पृथिवी चाग्निश्चाधितिष्ठतस्तत्तृप्यति तस्यानु तृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेन इति ॥२१॥

यानंतर जी तिसरी आहुति दिली जाईल, ती त्याने 'अपानाय स्वाहा' म्हणून द्यावी. त्यामुळे अपान तृप्त होईल. अपान तृप्त झाला की वाणी तृप्त । वाणी तृप्त झाली की अग्नि तृप्त आणि अग्नि तृप्त झाला की पृथ्वी तृप्त होईल. पृथ्वी तृप्त झाली की पृथ्वीवर अधिष्ठित असलेल्या सर्वच गोष्टी तृप्त होतील. त्याचबरोबर भोक्ता, प्रजा, पशु, अन्नाद्य तेज आणि ब्रह्मतेजाने तृप्त होईल.

- द्वाविंश खण्ड -

अथ यां चतुर्थीं जुहुयात् तां --- 'समानाय स्वाहा' इति समानस्तृप्यति समाने --- मनः — पर्जन्य — विद्युत् --- तस्यानु तृप्तिं ----- तेजसा ब्रह्मवर्चसेन इति ॥२२॥

चौथी आहुति देताना 'समानाय स्वाहा' असे म्हणून द्यावी. त्याने समान तृप्त होईल. त्यातून मन, त्यातून पर्जन्य — त्यातून विद्युत तृप्त होईल. त्यानंतर जे काही विद्युत व पर्जन्यावर अधिष्ठित आहे ते सर्व तृप्त होईल. त्याच्या तृप्तीनंतर भोक्ता प्रजेने, पशुने, अन्नाद्याने तेजाने व ब्रह्मवर्चसाने तृप्त होईल.
त्याला मितरांचे सदैव स्मरण राहील.



© www.madhuveer.com

- त्रयोविंश खण्ड -

अथ यां पञ्चमीं जुहुयात् तां जुहुयात् 'उदानाय स्वाहा' इति उदानस्तृप्यति ॥ उदाने — त्वक् — वायु — आकाश — तृप्यति । ------- प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति ॥

नंतर पाचवी आहुति देताना 'उदानाय स्वाहा' म्हणावे. त्याने उदान तृप्त होईल. मग त्वचा—वायु—आकाश तृप्त होईल आणि वायु व आकाशावर अधिष्ठित असलेले सर्व तृप्त होईल. भोक्ता प्रजा पशु अन्नादि, तेजाने तृप्त होईल.

१. प्राणाय स्वाहा — चक्षु — आदित्य — द्यौ
२. व्यानाय स्वाहा — श्रोत्र — चंद्रमा — दिशा
३. अपानाय स्वाहा — वाणी — अग्नि — पृथ्वी
४. समानाय स्वाहा — मन — पर्जन्य — विद्युत
५. उदानाय स्वाहा — त्वक् — वायु — आकाश.

- चतुर्विंश खण्ड -

स य इदम् (वैश्वानर दर्शनम्) अविद्वान् अग्निहोत्रं जुहोति यथा अङ्गारान् अपोह्य भस्मनि जुहुयात् तादृक् स्यात् ॥१॥

जो ही वैश्वानर विद्या न जाणताच अग्निची उपासना करतो तो जणू काही निखारे बाजूला करून हवन करावे असे करतो. ते व्यर्थ!

अथ य एतदेवं विद्वान् ------- सर्वेषु आत्मसु हुतं भवति ॥

आणि जो ही वैश्वानर विद्या जाणून अग्निहोत्रामध्ये आहुति देतो, त्याच्या आहुति सर्व लोकांना, सर्व भूतांना, सर्व आत्म्यांना पोहोचतात. म्हणजे त्याने दिलेल्या एका आहुतिने तो सर्वत्र पोहोचतो.

© www.madhuveeraghuveer.com

तद् यथा इषिकातूलम् अग्नौ प्रोतं प्रदूयेत एवं ह अस्य सर्वे पाप्मानः प्रदूयन्ते यः एतत् एवं विद्वान् अग्निहोत्रं जुहोति॥

तेच जेव्हा ही विद्या जाणणारा (विद्वान) अग्निहोत्रामध्ये हवन करतो तेव्हा इषिकेच्या अग्राप्रमाणे त्याची सर्व पापे जळून जातात.

तस्मात् उ ह एवंविद् यद्यपि चाण्डालाय उच्छिष्टं प्रयच्छेत् आत्मनि हैवास्य तद् वैश्वानरे हुतं स्यादिति तदेष श्लोकः॥

म्हणून असा वैश्वानरोपासक जरी चांडाळाला उच्छिष्ट देईल तरी ते उच्छिष्ट अन्नही आत्म्यामध्येच म्हणजे वैश्वानरातच हुत होईल. त्या संबंधीचा हा श्लोक आहे.

यथा इह क्षुधिता बाला मातरं पर्युपासते एवं सर्वाणि भूतानि अग्निहोत्रं उपासते इति अग्निहोत्रं उपासते॥

ज्याप्रमाणे भुकेलेली बालके आई केव्हा अन्न देईल त्याची वाट बघतात. त्याप्रमाणे जन्माला आलेली सर्व भूते, सर्व प्राणि अग्निहोत्राची उपासना करतात.

---

प्राणाची श्रेष्ठता, प्राणांचे वस्त्र जल : आपोष्णी
प्राणविद्येचे महत्व (आरुणि व त्याचा पुत्र श्वेतकेतु (ब्राह्मण असून) क्षत्रिय राजा जैवलि प्रवहण कडून पंचाग्नि विद्या शिकतात.

प्राचीनशाल, सत्ययज्ञ, इंद्रद्युम्न, शर्कराक्ष्य, बुडिल हे सर्वजण आणि उद्दालक आरुणि केकयपुत्र अश्वपतिकडे जाऊन वैश्वानर विद्या शिकतात. भोजनापूर्वी प्राणाहुती का द्यायच्या याचे उत्कृष्ट विवरण यात आहे.

S. PHILIP
A. PHILIP
With Best Compliments From
P. J. ENGINEERS
Mob.: 9422080596
9673544224

पुस्तकातील पान -223

(अध्याय - ६ वा

- आरुणि श्वेतकेतु -
संवाद



(१६ खंड)

- अध्याय ६ वा -

ॐ श्वेतकेतुर्हारुणेय आस तं ह पितोवाच श्वेतकेतो वस ब्रह्मचर्यं न वै सोम्यास्मत्कुलीनोऽननूच्य ब्रह्मबन्धुरिव भवतीति ।

आरुणि हे स्वतः विद्वान होते. त्यांचा मुलगा श्वेतकेतु. एकदा आरुणि श्वेतकेतुला म्हणाले, बाळा तू आचार्यांच्या गुरुकुलात जाऊन तिथे ब्रह्मचर्याचे पालन करुन रहा, व त्यांच्याकडून विद्या शिकून घे. आपल्या कुळात कोणीही न शिकता केवळ ब्रह्मबंधु म्हणवून घेत नाही (ब्रह्मबंधु ही एक शिवी आहे. उपहासाने न शिकलेला असा ब्राह्मणाचा भाऊ) आपल्या कुळपरंपरे प्रमाणे तू गुरुगृही जा.

स ह द्वादशवर्ष उपेत्य चतुर्विंशतिवर्षः सर्वान्वेदानधीत्य महामना अनूचानमानी स्तब्ध एयाय तं ह पितोवाच श्वेतकेतो यन्नु सोम्येदं महामना अनूचानमानी स्तब्धोऽस्युत तमादेशमप्राक्ष्यः ॥

वडीलांनी सांगितल्याप्रमाणे श्वेतकेतु गुरुगृही १२ वर्षे राहून जेव्हा घरी परत आला तेव्हा तो २४ वर्षांचा झाला होता. या १२ वर्षात त्याने वेदाध्ययन केले. वस्तुतः विद्या ही विनयाने शोभून दिसते परंतु हा श्वेतकेतु मात्र विद्याभ्यासाने उद्धट बनला. विद्वत्ते विषयी अत्यंत गर्वाने तो फुगून गेला. माझ्यासारखा [illegible] अशी भावना दृढ झाली. एवढेच नाही तर घरातील इतरांना तुच्छ लेखू लागला. मूर्ख बावळट अशा इतर सामान्य लोकांशी काय व कशाला बोलायचे अशा विचाराने तो शिष्टासारखा घुमा राहू [illegible]. त्याच्या वडीलांविषयी आदरभाव वाटेनासा झाला. वडीलांच्या लक्षात ही मुलाची अवस्था आली. ते स्वतः उत्तम आचार्य होते. पण घरकी मुर्गी दाल बराबर । किंवा

With Best Compliments From
VIJAY RUIKAR

घरका जोगी जोगडा वाटू लागतो. आपल्या वडीलांना फारसे काहीच माहिती नसावे, अशी कल्पना त्याने करून घेतली. मला दुसऱ्या आचार्यांकडे पाठवण्याचे कारण म्हणजे यांना काही येत नसावे असे त्याला वाटले. आता माझ्यासारखा विद्वान यांच्यासारख्या अडाण्याशी बोलणार तरी काय? त्यापेक्षा न बोललेलेच बरे!

परंतु मुलाचा हा अविनय, उद्धटपणा वडीलांना आवडला नाही. त्याचे डोळे उघडायलाच हवेत अशा विचाराने त्यांनी मुलाला जवळ बोलावले व म्हणाले "अरे तू तुझ्या आचार्यांकडून आदेश घेतलास का? ब्रह्माचा उपदेश करणारे ज्ञान तुला गुरुंकडून मिळाले का? (मनात विचार केला की याच्या उद्धटपणावरूनच कळून चुकले आहे की याला ते ज्ञान मिळालेले नाही.

येन अश्रुतं श्रुतं भवति अमतं मतं अविज्ञातं विज्ञातम् इति कथं नु भगव: स आदेशो भवति इति ॥३॥

वडीलांनी शांतपणे सांगितले की हा आदेश (श्रुतिवचन) समजला की कधीही न ऐकलेले सर्व ऐकल्याप्रमाणे होते. पूर्वी कधी ज्याचे मनन केले नव्हते त्याचेही मनन केल्याप्रमाणे होते, जे माहित नाही ते आपोआप माहीत होते.



हे ऐकून मुलाचा काही त्यावर विश्वास बसला नाही. तो म्हणाला असा कसा काय आदेश असू शकतो की केवळ तो जाणला की सर्व जाणल्याप्रमाणे होईल?

यथा सोम्य एकेन मृत्पिण्डेन सर्वं मृन्मयं विज्ञातं स्यात् वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिका इति एव सत्यम् ॥४॥



© www.madhaveeraghuveer.com

अरे बाळा, जसे मातीच्या गोळ्याला जाणले की त्यापासून बनलेल्या सर्व गोष्टींना जाणल्यासारखे होते. माती हे कारण Raw material आहे त्यामुळे त्यापासून बनलेल्या कार्यात finished product मध्ये ते आहेच. आकार वेगवेगळे असले तरी मूळ गोष्ट एकच आहे. आता त्याविषयी वेगळी माहिती गोळा करायला नको. नावे वेगळी असतील (सुरई, माठ, घडा, पणती, कुंडी) रूप वेगळे असेल पण त्यातील माती खरी आहे. मातीचे गुणधर्म त्यात आहेतच. Chemistry मध्ये देखील एकच मूलद्रव्य आश्चर्यकारकरीतीने अनेक गोष्टीत आढळते. Ferrous - Iron - शरीरातील रक्तात आहे - लोह, कॅल्शियम - हाडं।

यथा सोम्य एकेन नखनिकृन्तनेन सर्वं कार्ष्णायसं विज्ञातं स्यात् वाचारम्भणं विकारो नामधेयं कृष्णायसम् इत्येव सत्यम् इति एवं सोम्य स: आदेश: य: मया उक्त: भवति॥६॥

बाळा, त्याप्रमाणे नेलकटरला जाणले की लोखंडाच्या इतर वस्तूंना जाणल्यासारखे होते. केवळ वेगवेगळ्या नावांमुळे, आकारामुळे भेद वाटते. खरी गोष्ट आहे ती त्यातील लोखंडच आणि बाळा, तसेच मी त्या आदेशाबद्दल आधी बोललो होतो तोही तसाच आहे.
थोडक्यात ब्रह्माचे स्वरूप समजावून सांगणारा आदेश कळला तर ब्रह्मापासून हे जे विश्व बनले आहे, त्याचे स्वरूप समजते. त्याचा वेगवेगळा अभ्यास करावा लागत नाही.

न वै नूनं भगवन्तस्त एतदवेदिषुर्यद्ध्येतदवेदिष्यन् कथं मे नावक्ष्यन्निति भगवांस्त्वेव मे तद्ब्रवीत्विति तथा सोम्येति होवाच॥७॥
यावर श्वेतकेतु म्हणाला, माझे पू. आचार्य त्या एका वस्तूबद्दल जाणत नसतील. जर ते जाणत असते तर त्यांनी मला सांगितले असते ना? आता आपणच मला त्या वस्तूबद्दल सांगा. ठीक आहे. उद्दालक म्हणाले.

With Best Compliments From
Shree Shivasiddhannm Steels
Supplier of:
Construction Steel &

– द्वितीय खंड –

सदेव सोम्य इदम् अग्रे सत् एव आसीत् । तद् हैक आहुः असत् एव इदम् अग्रे आसीत् एकम् एव अद्वितीयम् इति आहुः । तस्मात् असतः सत् जायत ।

हे सोम्य (वत्सा) हे दृश्य जगत निर्माण होण्यापूर्वी केवळ 'सत्' होते, आणखी [illegible] नव्हते. विश्व निर्माण होण्यापूर्वी असणारे म्हणजेच सत् होते. एकमेव अद्वितीय असे. त्या सत्शिवाय काहीच नव्हते. ते एकटे एक होते. त्यात विजातीय, स्वजातीय, स्वगत असे कोणतेही भेद नव्हते. अस्तित्वात असणाऱ्या त्या एकाला कोणतेही अवयव नव्हते. ते एकसंध होते. त्याच्याहून वेगळे कोणीही नव्हते.

परंतु काहींच्या मते अगदी सुरुवातीला काहीच नव्हते म्हणजे असत् (अभाव) होता. पोकळी होती आणि त्या अभावातूनच सत् निर्माण झाले. व्यवहारातही आपण पहातो की एखाद्या मोकळ्या प्लॉटवर अचानकच मोठी इमारत उभी रहाते, तसे काही नसण्यातून हे विश्व निर्माण झाले. शून्यातून जग निर्माण झाले असे समजतात.

कुतस्तु खलु सोम्य एवं स्यात् इति होवाच कथम् असतः सत् जायेत इति । सत् तु एव सोम्य इदम् अग्रे आसीत् एकम् एव अद्वितीयम्

पण बाळा, असे कसे शक्य आहे? असत्मधून सत् कसे प्रकट होईल? [illegible] कसे होणार? अभावातून भाव कसा होईल? विटा, सिमेंट शिवाय इमारत कशी उभी रहाणार? मातीशिवाय घडा, सोने, [illegible] कशी काय करता येईल? [illegible] शिवाय [illegible] केवळ अशक्य आहे. [illegible] काही नसताना [illegible] अभावातून भाव किंवा असत्मधून सत् निर्माण होणे शक्य नाही. [illegible] प्रथम काहीतरी होते. त्यालाच [illegible] सत् [illegible] नावाने [illegible] अस्तित्व [illegible]!

With Best Compliments From

तद ऐक्षत बहु स्याम प्रजायेय इति । तत तेज ऐक्षत बहु स्याम् प्रजायेय इति तत अपः असृजत । ~~तस्मात~~ तस्मात यत्र क्वच शोचति स्वेदते वा पुरुषः तेजस एव तद अध्यापो जायन्ते ।।३।।

ते जे काही (सत) होते त्याने अनेक होण्याची इच्छा केली. मी प्रजा निर्माण करावी असे त्याला वाटले. त्याला केवळ अस्तित्वच नव्हते तर त्याला बुध्दि होती, इच्छा होती, करण्याची शक्ती होती म्हणूनच ते सत चित आनंद स्वरूप होते. अस्तित्व, इच्छा, क्रिया शक्ती आणि त्याच्यापासून जे जे निर्माण झाले त्या सर्वांत या शक्ती होत्याच. त्यातून तेज निर्माण झाले. या तेजाला अनेक होण्याची इच्छा झाली. त्याने त्याच्यातून आप निर्माण केले. तेजापासून आप। कधीही माणसाला कशाचा ताप (तेज) झाला की घाम (आप) फुटतो.

☆ सत म्हणजे शुध्द अस्तित्व आहे. जे आहे त्यातूनच नवीन काहीतरी उत्पन्न होऊ शकते. असण्यातूनच होणे प्रकट होऊ शकते.
Being ——> Becoming । अस ——> भू भवति ।
जे नाही त्याच्यातून काहीच निर्माण होत नाही. याचाच अर्थ असा की दृश्य नामरूपाचा पुर्णपणे निरास झाला तरी मूळ परमात्मवस्तु आहेपणाने कायमच राहते. शुध्द असणेपणाच्या मुळात असणे हा प्राण आहे. ते जर नसेल तर असण्याला काही अर्थच उरणार नाही. असण्याचे असणे कशावर अवलंबून नाही. ते स्वतःसिध्द आणि स्वयंप्रकाश आहे. पाणी, दगड, चंद्र, माणूस वा मृत्यु या सर्वांमध्ये जे असणेपण अनुभवाला येते त्याच्यापलीकडे जे आहे ते शुध्द असणेपण आहे. अस्तित्व निराकार आहे त्याचा निर्देश होत नाही. इंद्रियांनी त्याचा बोध होत नाही. मनाने त्याचे आकलन होत नाही. आपले सारे व्यवहार स्थलकालाच्या चौकटीत चालतात

With Best Compliments From

आणि म्हणूनच कालातीत अस्तित्व कालमर्यादेत राहून अनुभवता येत नाही. जिथे सर्व दृश्य नाहीपणाने लीन होते ते शुद्ध अस्तित्व समजावे. परंतु याचा अर्थ असा नाही की दृश्य विश्व लीन झाल्यावर शून्य शिल्लक रहाते. कारण शून्य स्वत: काही नसल्याने त्याला जाणणारा कोणीतरी हवा ना! नाहीतर त्याचे असणेपण कसे समजणार? म्हणून शून्यातून सर्व निर्माण झाले असे म्हणता येणार नाही. / साधन करत असताना विषयाच्या सर्व वृत्ति शांत झाल्या म्हणजे शून्यावस्था येते. परंतु शून्यावस्था म्हणजे आत्मदर्शन नव्हे. त्यासाठी त्याच्याही अतीत जावे लागते.

इतर उपनिषदांमध्ये पाच महाभूतांचा उल्लेख आढळतो तर सामवेदामध्ये केवळ तीनच (तेज, आप, पृथ्वी) पंचभूते मानली जातात. त्यामुळे इथे पंचीकरण नसून त्रिवृतकरणाचा उल्लेख आहे. कारण त्यांच्या मतानुसार आकाश व वायु इतकी सूक्ष्म आहेत की सामान्य बुध्दीला ती कळतच नाहीत. ∴ त्यांचा उल्लेख टाळला आहे. मात्र तेजाला राहण्यासाठी जागा - Space म्हणजे आकाश हवेच व तेज धारण करण्यासाठी वायु हवाच, हे मात्र त्यांनी गृहीत धरलेले आहे.

ता आप ऐक्षन्त बह्व्यः स्याम प्रजायेयमहीति। ताः अन्नम् असृजन्त तस्मात् यत्र क्व च वर्षति तत् एव भूयिष्ठम् अन्नं भवति अद्भ्यः एव अन्नाद्यं अभिजायते।

त्या आपांनी अनेक होण्याची इच्छा केली. त्यांनी अन्नाची निर्मिती केली. आणि म्हणूनच जिथे खूप पाऊस पडतो तिथे पुष्कळ धान्य निर्माण होते. पाणीच धान्याचे रूप घेते. वृक्ष मुळातून पाणी घेतो तेच पाणी खोड, पाने, फुले, फळे यांचे रूप घेते. एकूण सर्व विश्वामध्ये पाणीच अन्नरूपाने असते.

With Best Compliments from
प्रॉपर्टी तमची
▸ गुंठेवारी ▸ एन. ए. ऑर्डर
▸ सरकारी मोजणी ▸ प्रॉपर्टी कन्सल्टंट

AUGUST
30
FRIDAY

श्रावण कृ. ९ संवत २०६९
शुक्रवार ३०/८/२०१३

JULY 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

- तृतीय खण्ड

तेषां खल्वेषां भूतानां त्रीण्येव बीजानि भवन्त्याण्डजं जीवजम् उद्भिज्जम् इति ॥१॥

ही जी तीन भूते आहेत तीच (तेज, आप, पृथ्वी) तीन बीजे बनतात. अण्डज, जारज, उद्भिज. इथे स्वेदजाचा उल्लेख नाही.

सेयं देवतैक्षत हन्ताहम् इमा: तिस्र: देवता: अनेन जीवेन आत्मना अनुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणीति ॥२॥

त्या ह्या देवतेने (सत् ने) विचार केला की मी या तीन देवता (महाभूते - तेज, आप, पृथ्वी) निर्माण केल्या आहेत. मी यांच्यात जीव बनून प्रवेश करीन. नामरूपांचे विवरण करीन. मी सगुण रूपात भिन्न भिन्न नावे घेऊन प्रकट होईन. आणि ते सत् वेगवेगळी नावे व रूपे घेऊन प्रकट झाले.

तासां त्रिवृतं त्रिवृतमेकैकां करवाणीति सेयं देवता इमा: तिस्र: देवता: अनेन जीवेन आत्मना अनुप्रविश्य नामरूपे अकरोत्

आतापर्यंत या तीन देवता - तेज, आप, पृथ्वी - तत्वरूपाने, सूक्ष्मरूपाने, तन्मात्रा स्वरूपातच होत्या. त्या व्यक्त दृश्यरूपात नव्हत्या. प्रकटीकरणासाठी त्यांचे एकत्रीकरण व्हायला हवे.
दृश्य तेज ⟶ ५० % तेज + २५ % आप + २५ % पृथ्वी
दृश्य आप ⟶ ५० % आप + २५ % तेज + २५ % पृथ्वी
दृश्य पृथ्वी ⟶ ५० % पृथ्वी + २५ % तेज + २५ % आप
अशा त्रिवृतीकरणानंतर ती तीनही भूते व्यक्त स्वरूपात आली. आणि मग सत् ने जीवरूपाने त्यात प्रवेश केला.

With Best Compliments From

© www.madhavieeraghuveer.com

म्हणजेच त्या सत् ने निरनिराळ्या नामरूपांमध्ये स्वतःला प्रकट केले. या विश्वात जे पहायला मिळते ते सत्‌चीच रूपे.

तासां त्रिवृतं त्रिवृतमेकैकामकरोद्यथा तु खलु सोम्येमास्तिस्रो देवताः त्रिवृत् त्रिवृत् एकैका भवति तन् मे विजानीहि इति॥४॥

मग त्याने त्या एकेकाला त्रिवृत केले. त्यामुळे या तीनही देवता त्रिवृत त्रिवृत झाल्या. (५०% मुख्य देवता व २५% इतर दोन तत्त्वे) त्या कशा झाल्या हे मी तुला व्यवस्थित सांगतो.

## चतुर्थ खण्ड

यदग्ने रोहितं रूपं तेजसस्तद्रूपं यच्छुक्लं तदपां यत्कृष्णं तदन्नस्यापागादग्नेरग्नित्वं वाचारम्भणं विकारो नामधेयं त्रीणि रूपाणि इति एव सत्यम्॥१॥

जेव्हा प्रत्येक भूत त्रिवृत झाले तेव्हा ते दृश्य व व्यवहारात उपयोगात आणण्यायोग्य झाले. तोपर्यंत ते केवळ तन्मात्रा स्वरूपात होते. त्यात विकार झाला म्हणजे तिन्ही तत्त्वे एकत्र आली. म्हणजेच मूळ कारण रूपातील तीन भूत म्हणजे तीन तन्मात्रा हे सत्य असले तरी बाकी सर्व हे वेगवेगळ्या प्रमाणातील मिश्रणाचे खेळ आहेत. दृश्य रूपात दिसणारा अग्नि म्हणजे वास्तवात तीन भूतांचे एकत्रीकरण आहे.

अग्निमध्ये तीनही भूते आहेतच. ज्वाळा भडकल्या की त्यात लाल, काळ्या, पांढऱ्या छटा दिसतात. त्यातील लाल हे तेजाचे तर शुक्ल हे आपाचे आणि कृष्ण हे पृथ्वीचे दृश्य रूप आहे. हे तीन तर वेगळे केले तर अग्नीचे अग्नित्वच उरणार नाही. म्हणजेच अग्नि हा कार्य स्वरूपात न रहाता कारण स्वरूपात जाईल - तन्मात्रा

© www.madhaveeraghuveer.com

विकार झाला म्हणजे हे तीन एकत्र आले. त्यात सर्वाधिक अंश तेजाचा (७०%) होता आणि आप व पृथ्वी कमी प्रमाणात होते तेव्हा त्या बदललेल्या रूपाला 'अग्नि' हे नाव मिळाले. हे सर्व विकाराचे खेळ आहेत. आपल्याला डोळ्यांना जो अग्नि दिसतो त्यात तीन भूतांचे एकत्रीकरण आहे.

यदादित्यस्य रोहितं रूपं तेजसस्तद्रूपं यच्छुक्लं तदपां यत्कृष्णं तद् अन्नस्य। अपागात् आदित्यस्य आदित्यत्वम्। वाचारम्भणं विकारः नामधेयम्। त्रीणि रूपाणि इति एव सत्यम्॥

तेजाच्या सर्वच रूपांमध्ये वास्तविक तीन भूतांचे त्रिवृत्तीकरण आहे. ज्याला आपण सूर्य म्हणतो तो खरा कसा आहे? आदित्यातील जे लाल रूप आहे ते तेजाचे रूप आहे. त्यातील शुभ्र रूप आपाचे व कृष्णरूप हे अन्नाचे रूप आहे (पृथ्वीचे). म्हणजे आदित्यामधील आदित्यत्व निघून गेले. हे तीन भूतांच्या विकारांचे (एकत्रीकरणाचे) केवळ नाममात्र आहे. म्हणजे तीन भूते हेच त्याचे खरे स्वरूप आहे.

खरे तर दिसणारी प्रत्येक वस्तू म्हणजे मुळात तीन महाभूते आहेत. त्यांच्या मिश्रणानुसार दृश्य वस्तूला ते ते नाव दिले जाते.

यत् चन्द्रमसः रोहितं रूपं तेजसः रूपं यत् शुक्लं तत् अपां यत् कृष्णं तत् अन्नस्य रूपं। अपागात् चन्द्रात् चन्द्रमसत्वम् वाचारम्भणं विकारो नामधेयम् त्रीणि रूपाणि इति एव सत्यम्॥३॥

चंद्रामधील लाल रूप तेजाचे, शुभ्र आपाचे तर कृष्ण हे अन्नाचे (पृथ्वीचे) रूप आहे असे ज्ञान झाले की चंद्राचे चंद्रत्व उरत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From

यत् विद्युत: रोहितं रूपं तत् तेजस: रूपं, यद् शुक्लं तत् अपां, यत् कृष्णं तत् अन्नस्य, अपागात् विद्युत: विद्युत्त्वम् । वाचारम्भणं विकार: नामधेयम् । त्रीणि रूपाणि इति एव सत्यम् ॥

वीजेमधील लाल रूप तेजाचे, शुभ्र अपाचे तर कृष्ण पृथ्वीचे रूप आहे असा विचार केला की वीजेचे वीजत्व शिल्लक उरत नाही. तीन भूतांच्या एकीकरणाला वीज हे नाव दिले आहे.

अंतरिक्षात तेजाची तीन प्रमुख रूपे दिसतात. सूर्य, चंद्र आणि वीज । तीन महाभूतांच्या मिश्रणातील अंशांचे प्रमाण कमी जास्त झाले की त्यांच्या दृश्य परिणामाला दिलेली ही नावे आहेत. मुळात तीन गोष्टी वेगळ्या नाहीत. हे आधी लक्षात घ्यायला हवे. अनेकत्व दिसत असले तरी त्या सर्वांमध्ये एकत्व आहेच. हेच यातून निष्पन्न होते.

बटाट्यापासून भाजी, भजी, वडे, टिक्की, पराठा करता येतात पण शेवटी सगळ्यांच्या मुळाशी असतो तो बटाटाच! नवशिक्या व्यक्तीला याचे आश्चर्य वाटेल तरी कसलेल्या गृहिणीला त्याचा कोणताही पदार्थ बनवणे कठीण वाटत नाही. तसेच या विविधरंगी सृष्टीचे मूलतत्त्व कळले की त्यांच्यामधील एकत्व दिसून येते. मग संभ्रम नाहीसा होतो. भेदयुक्त विश्वामध्ये अभेद जाणवतो. भेद म्हणजे अज्ञान । अभेद हेच ज्ञान ।
पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।

एतद् ह स्म वै तद्विद्वांस आहु: पूर्वे महाशाला महाश्रोत्रिया: न नोऽद्य कश्चनाश्रुतममतमविज्ञातम् उदाहरिष्यति इति ह्येभ्यो विदां-

पूर्वी महागृहस्थ तसेच महाश्रोत्रिय यांना या त्रिवृत्करणाचे ज्ञान होते. अरुणि उद्दालक असेच होते आणि म्हणूनच त्यांनी (आग्रहपूर्वक

३६ मार्च २०२०



सांगितले की आमच्या कुळात कोणी ब्रह्मबंधु नाही, कुणीही अश्रुत, अमत, अविज्ञात असा राहिलेला नाही. त्यांना सर्व ज्ञातच आहे. कारण, या विश्वातील कोणतीही गोष्ट घेतली तरी ती या महाभूतांचे एकत्रीकरणच आहे. आणि ज्यांना या तीन महाभूतांचे ज्ञान असेल त्यांच्यासाठी नवीन किंवा अज्ञात असे काहीच नाही. अगदी नवी गोष्टदेखील त्यांना माहीत असतेच.

कारण हे ज्ञानी महात्मे त्यामागचे कारण (कच्चा माल) जाणतात. नावे निरनिराळी असली तरी त्यामागील मूलतत्त्व समानच असते. त्यामुळे त्यांच्यासाठी ही वरवरची विविधता एकतेत पालटते.

यदु लोहितमिव अभूत् इति तेजसः तद् रूपम् इति तद् विदाञ्चक्रुः।
यद् उ शुक्लमिव अभूत् इति अपां रूपम् इति तद् विदाञ्चक्रुः॥
यद् उ कृष्णमिव अभूत् इति अन्नस्य रूपम् इति तद् विदाञ्चक्रुः॥

जाणकारांना कोणतीही गोष्ट अविज्ञात उरत नाही. प्रत्येक गोष्टीत दिसणारे रूप म्हणजे या तीन भूतांचा समुदाय आहे हे त्यांना माहीत असते. प्रत्येक वस्तूतील लाल भाग हा तेजाचे रूप, पांढरा भाग हे आपाचे रूप तर कृष्ण भाग आहे तो पृथ्वीचे (अन्नाचे) रूप आहे हे ते जाणून असतात. जे काही विज्ञात सत्यासारखे वाटते आहे ते या तीन देवतांचे एकत्रित रूपच आहे.

हे तीन देव (३ भूते) एकत्र येऊन पुरुषात कसे त्रिवृत कार्य करतात हे मी तुला सांगतो. तू ते जाणून घे.

विश्वातील सर्व वस्तू वेगवेगळ्या भासल्या तरी त्या वेगळ्या नाहीत. त्या तीन महाभूतांच्या मिश्रणाचे प्रमाण वेगळे वेगळे असते आणि एकदा हे समजले की न पाहिलेली गोष्ट पाहिल्याप्रमाणे होते.
गणपती आणि उंदीर —— माती एकच आकार भिन्न।
महिषासुर आणि कालीमाता - सुवर्णाचेच.

– पञ्चम खण्ड –

अन्नमशितं त्रेधा विधीयते । यः तस्य स्थविष्ठः धातुः तत् पुरीषं भवति यो मध्यमः तत् मांसं यः अणिष्ठः तत् मनः ॥

माणसाने खाल्लेले अन्न तीन प्रकारे (तीन भूतांपासून) बनलेले असते. अन्नाचे तीन भागात विभाजन होते. त्यातील स्थूल भाग (कृष्ण) विष्ठा बनतो. मध्यम भागाचे (श्वेत) मांस बनते. आणि सूक्ष्म भाग (तेज-लाल) पासून मन बनते.

यासाठीच आहाराचा विचार आपल्या संस्कृतीत केला गेला आहे. केवळ उदरभरण हा भोजनाचा हेतु असूच शकत नाही. केवळ पुष्टिबल महत्वाचे नाही. तर मनोबल हे अन्नातील सारभूत भागावर अवलंबून असते. अन्नातील लोण्यासारखा सूक्ष्म भाग – त्यापासून मन बनते. त्यातूनच वृत्ती व विकार घडत असतात. खाल्लेल्या अन्नापासूनच विष्ठा, मांस व मन बनणे हा देखील अन्नाचा विकार आहे. तीन भूतांपासून बनलेले अन्न हे तीन विभागात परिणत होत असते. मन हे अन्नमय असते.

आपः पीतास्त्रेधा विधीयन्ते तासां यः स्थविष्ठो धातुस्तन्मूत्रं भवति यो मध्यमस्तल्लोहितं यो अणिष्ठः स प्राणः ॥२॥

माणूस जे पाणी पितो ते तीन रूपांमध्ये परिणत होते. त्याचा ~~सूक्ष्म~~ स्थूल भाग मूत्र होतो. मध्यम भागाचे रक्त होते आणि सूक्ष्म भागाचे प्राण बनतात. पृथ्वी – आप – तेज

प्राण हे आपोमय असतात. त्यामुळे नुसत्या पाण्यावर देखील प्राण तग धरू शकतात. परंतु पाण्याशिवाय राहता येत नाही. प्राण आपोमय असतात. – नित्य बहुवचनी.

तेजो अशितं त्रेधा विधीयते तस्य यः स्थविष्ठः धातुः तत् अस्थि भवति । यः मध्यमः सः मज्जा भवति । यः अणिष्ठः सा वाक् भवति ॥

खाल्लेल्या तेल, तूप, लोण्याचे पण तीन प्रकार होतात. त्याच्या स्थूल भागापासून (पृथ्वीतत्त्वापासून) हाडे बनतात. मध्यम भाग (आप) मज्जा - हाडांमधील द्रवपदार्थ बनवतो व सूक्ष्म भाग (तेज) वाणी बनतो. खाल्लेल्या तेजस्वी भागाचे हाडे, मज्जा, वाणी बनते.

अन्नमयं हि सोम्य मन आपोमयः प्राणस्तेजोमयी वागिति भूय एव भगवान् विज्ञापयत्विति तथा सोम्य इति ह उवाच ॥

तेव्हा हे बाळा, मन हे अन्नमय, प्राण हे आपोमय व वाणी ही तेजोमयी असते.
या बोलण्याचा नीटसा अर्थ श्वेतकेतुला समजला नाही. तेव्हा तो म्हणाला - भगवन् आपण पुन्हा समजावून सांगा.
वडील म्हणाले - ठीक आहे बाळा. मी समजावून सांगतो. मुलाच्या मनात कोणताही संदेह किंतु राहू नये म्हणून त्याला हा सिद्धांत सप्रयोग समजावत आहेत.

| | अन्न | पाणी | तूप |
|---|---|---|---|
| पृथ्वी | विष्ठा | मूत्र | अस्थि |
| आप | मांस | रक्त | मज्जा |
| तेज | मन | प्राण | वाणी |

© www.madhaveeraghuveer.com

SEPTEMBER
7
SATURDAY

भाद्रपद शु. २ संवत २०६९
शनिवार ७/९/२०१३

TDS payment of August

AUGUST 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

षष्ठ खण्ड ॥१॥

दध्नः सोम्य मथ्यमानस्य यो अणिमा स ऊर्ध्वः समुदीषति तत्सर्पिर्भवति
एवमेव खलु सोम्य अन्नस्य अश्यमानस्य यो अणिमा स ऊर्ध्वः
समुदीषति तन्मनो भवति ॥२॥

जेव्हा दही घुसळले जाते तेव्हा त्याचा सूक्ष्म भाग हे त्याचे सार असते ते लोण्याच्या रुपाने वर येते. सार नेहमीच हलके असते ते वर तरंगते. पुन्हा ते लोणी कढवले की त्यातील स्थूल भाग-बेरी खाली बसतो व त्या साररुप लोण्याचे तूप बनते. थोडक्यात दह्यावर प्रक्रिया केली की त्याचे विभाजन होऊन सार वर येते. ते तुपात परिवर्तित होते. मर्दनम् गुणवर्धनम् । अशाच प्रकारे आपण खाल्लेल्या अन्नाचा सूक्ष्म साराचा भाग वर येतो. त्याचेच मन बनते. ~~[illegible]~~ जठरात मंथनक्रिया चालते. व त्याचे तीन भाग होतात.

अपां सोम्य पीयमानानां यो अणिमा ------ सः प्राणः भवति ॥३॥
तेजसः सोम्य अश्यमानस्य यो अणिमा ------ सा वाग् भवति ॥४॥

अरे बाळा, प्यायलेल्या पाण्याचा जो सूक्ष्म भाग ~~बनतो~~ असतो ते सार असते. ते वर येऊन त्याचा गोळा बनतो. त्याचाच प्राण बनतो

SUNDAY, SEPTEMBER 8 हरितालिका तृतीया भाद्रपद शु. ३ संवत २०६९

आणि सोम्य, खाल्लेल्या तुपाचा जो सूक्ष्म भाग वर येऊन गोळा होतो त्याचीच वाणी बनते.

अन्नमयं हि सोम्य मन आपोमयः प्राणस्तेजोमयी वागिति भूय
एव मा भगवान् विज्ञापयतु इति तथा सोम्य इति ह उवाच ॥५॥

बाळा, अशा प्रकारे मन हे अन्नमय, प्राण आपोमय तर वाणी तेजोमयी असते कळले का? नाही बाबा अजूनही नीटसे समजले नाही मला पुन्हा समजावून सांगा. ठीक आहे.

With Best Compliments From
श्री. लक्ष्मीदास (बच्चुभाई) ऑफिस – सदाशिव कॉम्प्लेक्स

© www.madhaveeraghuveer.com

(कोरोनाची धास्ती)

२८ मार्च २०२०



— सप्तम खण्ड —

षोडशकलः सोम्य पुरुषः पञ्चदशाहानि मा अशीः। काममप: पिब अपोमयः प्राणः। न पिबतो विच्छेत्स्यत इति॥१॥

बाळा, पुरुष सोळा कलांचा बनलेला असतो. (प्रश्नोपनिषद - ६.४) तू पंधरा दिवस काहीही खाऊ नकोस. मात्र हवे तेवढे पाणी पी. प्राण हे अपोमय असतात. त्यामुळे पाणी प्यायल्याने प्राणांचे रक्षण होईल. मात्र पाणी प्यायला नाहीस तर प्राणांचा नाश होईल.

स ह पञ्चदश अहानि नाशाय हैनम् उपससाद किं ब्रवीमि भो इत्यृचः सोम्य यजूंषि सामानि इति स ह उवाच न वै मा प्रतिभान्ति भो इति॥ २"

आरुणींनी सांगितल्याप्रमाणे श्वेतकेतु १५ दिवस अन्नाशिवाय राहिला व नंतर वडीलांजवळ येऊन म्हणाला, काय म्हणू? तेव्हा वडील म्हणाले, काहीही म्हण. कोणतीही ऋचा, वेदमंत्र, साम यजुर्वेदातील मंत्र काहीही म्हण. तेव्हा श्वेतकेतु म्हणाला, बाबा मला काहीही स्फुरत नाही, सुचत नाही.

तं ह उवाच यथा सोम्य महतोऽभ्याहितस्य एकः अङ्गारः खद्योतमात्रः परिशिष्टः स्यात् तेन ततोऽपि न बहु दहेत् एवं हे सोम्य ते षोडशानां कलानाम् एका कला अतिशिष्टा स्यात् तया एतर्हि वेदान् न अनुभवसि अशान अथ मे विज्ञास्यसि इति।

तेव्हा वडील म्हणाले, बाळा जेव्हा खूप इंधन घालून पेटवलेल्या अग्निमधील जेव्हा काजव्या एवढा छोटासा निखारा शिल्लक राहतो, तेव्हा तो (भडकलेल्या अग्निप्रमाणे) दाह देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे बाळा, तुझ्या शरीरातील सोळा कलांपैकी केवळ एकच

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

कला (पाण्यामुळे) शिल्लक राहिली आहे. म्हणून तू शिकलेल्या वेदांना प्रगट करू शकत नाहीस. जे शिकला आहेस त्या मंत्रांचे, यजूंचे, सामांचे स्मरण तुला नाही, स्फुरण होत नाही. त्यापेक्षा असे करूया. तू जेवून घे. मग आपण बोलू.

स ह आश। अथ ह एनम् उपससाद। तं ह यत्किंच पप्रच्छ सर्वं ह प्रतिपेदे ॥४॥

मग श्वेतकेतु जेवला. जेवून झाल्यावर वडीलांकडे आला. आणि मग मात्र वडीलांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची नीट उत्तरे दिली. कारण आता त्याला सगळे नीट आठवत होते. अन्नसेवन केले नसल्यामुळे अन्नाने प्राप्त होणारी शक्ती त्याच्यात नव्हती तेव्हा त्याचे मन काम करत नव्हते. पण आता अन्न खाल्ल्यावर शक्ती मिळाली व मन चांगल्या प्रकारे काम करू लागले.

तं ह उवाच यथा सोम्य --- खद्योतमात्रं ----- प्राज्वलयेत्तेन- बहु दहेत्

आणि श्वेतकेतुला म्हणाले, रसरसून पेटलेल्या अग्निमधील एक छोटासा निखारा घेऊन त्यावर वाळके गवत टाकून तो चेतवला तर त्यातून पुन्हा मोठी आग निर्माण होईल व ती दाह देऊ शकेल.

एवं सोम्य ते षोडशानां कलानाम् एका कला अतिशिष्टा अभूत् साऽन्नेन उपसमाहिता प्राज्वाली तया एतर्हि वेदान् अनुभवसि अन्नमयं हि सोम्य मनः। आपोमयः प्राणः। तेजोमयी वाक् इति। तत् ह अस्य विजज्ञौ इति॥

तुझ्या अंगात एकच कला शिल्लक होती. ती अन्नाने पुष्ट झाल्यावर प्रज्वलित झाली. त्यातून तू वेदांचा अनुभव घेतो आहेस. तुला पुन्हा स्मरण झाले.

मन - अन्नमय
प्राण - आपोमय
वाणी - तेजोमय

© www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From
Nagraj N. Jain
Mob.: 9226115159
Pooja Garments
32, Anusuya Enclave, Near Shinde Chhatri, Wanowrie, Pune - 411 040. Tel. : 26851807

पाणी प्यायल्याने प्राण तगून राहतो. जीवात जीव येतो. पाण्याशिवाय प्राण राहू शकत नाहीत. अन्नातून मन तयार होते. अन्नामुळेच मन पुष्ट होते व विचार करू लागते. आणि वाणीची देवता अग्नि आहे. वाणीसाठी उष्णता लागते. तिच्यात तेज आहे आणि तिच्यामुळे तेज निर्माण करता येते. स्फूर्ति, प्रेरणा देण्याचे काम वाणीच करते. 'तुम मुझे खून दो। मैं तुम्हे आज़ादी दूँगा।' या वचनाच्या नुसत्या स्मरणाने रक्त सळसळते. वाणीमध्ये समजावण्याची नसेच चिथावणी देण्याची देखील ताकद आहे.

- अष्टम खण्ड -

उद्दालको ह आरुणि: श्वेतकेतुं पुत्रमुवाच स्वप्नान्तं मे सोम्य विजानीहि इति' यत्र एतत् पुरुष: स्वपिति नाम सता सोम्य तदा सम्पन्नो भवति स्वमपीतो भवति तस्मादेनं स्वपिति इति आचक्षते स्वं हि अपीतो भवति॥१॥

उद्दालक आरुणि आपल्या पुत्राला श्वेतकेतुला म्हणाले, बाळा, आता तू माझ्याकडून झोपेबद्दल जाणून घे. ज्यावेळी हा शरीर धारण करणारा, या नवद्वारयुक्त पुरात राहणारा (पुरि शेते) पुरुष, जेव्हा झोपतो तेव्हा सत् शी जोडला जातो. सत् शी एकरूप होतो. स्वत:मध्ये विलीन होतो. स्वपिति (स्वं अपिति / स्वे अपिति) म्हणजे झोपतो तेव्हा तो स्वत:मध्ये विलीन झालेला असतो.

प्रथम मनुष्य जेव्हा अंथरुणावर पडतो, तेव्हा त्याची स्थूल इंद्रिये थकलेली असतात ती सुस्त होतात, विश्रांति घेतात, झोपतात सूक्ष्म इंद्रिये मनामध्ये विलीन होतात. अशा वेळी मन जर जागे असेल तर स्वप्नसृष्टी उभी करून मन अनेक क्रिया करू शकते पण जेव्हा मन देखील सूक्ष्म इंद्रियांसह सुषुम्नमध्ये प्रवेश करते तेव्हा मनही झोपते व त्याबरोबर सूक्ष्म इंद्रियेही झोपतात.

©www.madhaveeraghuveer.com

ज्या वेळी सूक्ष्म इंद्रियांसह मन स्वप्नामध्ये म्हणजे आपल्या खऱ्या स्वरूपामध्ये, आत्म्यामध्ये विलीन होते. ही सुषुप्ति अवस्था म्हणजेच गाढ झोप! यात स्वप्नेही पडत नाहीत.

Rapid eye movement । या अवस्थेत स्वप्नाचा लय झाल्याने, विशेषत: मन हे परब्रह्माच्या सान्निध्यात असल्याने आनंदी, ताजेतवाने, टवटवीत असते. सकाळी प्रसन्न वाटते.

म्हणूनच प्रभाते मनी राम चिंतीत जावा.

माहेराहून आलेल्या स्त्रिया जसं येताजाता माहेराचे गुणगान करण्यात मग्न असतात तसं परब्रह्माला भेटल्यावर कधी काळ तरी त्याच्या सान्निध्यात राहण्यासाठी त्याचे नामस्मरण हवंच ना!

वो दुनिया मोरे बाबुलका घर। ये दुनिया ससुराल॥

स यथा शकुनि: सूत्रेण प्रबद्धो दिशं दिशं पतित्वा अन्यत्र आयतनं अलब्ध्वा बन्धनम् एव उपश्रयते एवमेव खलु सोम्य तन्मनो दिशं दिशं पतित्वा अन्यत्र आयतनम् अलब्ध्वा प्राणमेव उपश्रयते प्राणबन्धनं हि सोम्य मन इति॥ २॥

दोरीने बांधून खांबाला किंवा झाडाला जखडलेला पक्षी सुटका करून घेण्यासाठी इकडे तिकडे उडतो पण कुठेच आश्रय न मिळाल्यामुळे पुन्हा आपल्या मूळस्थानापाशी येतो त्याप्रमाणे हे मन दिशादिशांना धावण्याचा प्रयत्न करते पण पुन्हा बंधस्थाना पाशीच येते. कारण मन हे प्राणाशी बांधले गेले आहे.

जागे झाल्यावर मनाला वेगवेगळ्या विषयांकडे धावावेसे वाटते पण रात्री पुन्हा ते प्राणाच्या आश्रयालाच येते. जेव्हा ते प्राणाशी एकरूप होते तेव्हा त्याला खरा आनंद, खरी शांति मिळते. आत्म्याला सोडून मनाला कधीच खरी शांति मिळणार नाही. विषयांच्या मागे लागून इतर मन क्षुब्ध होते अशांत होते. खरी शांति आत्म्याशी भेट झाल्यावरच मिळते.

With Best Compliments From
MARG
Off. : 109, Brahma Garden,
© www.madhaveelaghuveer.com

अशनापिपासे मे सोम्य विजानीहि इति यत्र एतत्पुरुषः अशिशिषति नाम आपः एव तत् अशितं नयन्ते तत् यथा गोनायः अश्वनायः पुरुषनायः इत्येवं तदप आचक्षते अशनाय इति यत्र एतत् शुङ्गम् उत्पतितं सोम्य विजानीहि न इदम् अमूलम् भविष्यति इति॥७॥

बाळा, आता तू माझ्याकडून तहान व भुकेबद्दल जाणून घे. झोपेबद्दल मागिल मंत्रात सांगितले. तहान, भूक व झोप या माणसाच्या प्रमुख गरजा आहेत. सुषुप्तिविषयी सांगताना असे सांगितले की स्थूल इंद्रिये सूक्ष्म इंद्रियात विलीन होतात. सूक्ष्म इंद्रिय मनात व मन हे आत्म्यात म्हणजेच स्व/सत् मध्ये विलीन होते. एक एक पायरी मागे मागे जात उगमापर्यंत म्हणजे कारणापर्यंत जाते. कार्य हे नेहमीच कारणात विलीन होते. घडा फुटला की त्याची माती होते. शरीर पंचमहाभूतात विलीन होते. तसेच दररोज हा प्रलय होत असतो. त्याला दैनंदिन प्रलय/निद्राप्रलय असे म्हणतात. आता अशना (भूक) व पिपासा (तहान) यांच्याबाबतीत हाच नियम कसा लागू होतो ते पाहू या.

जेव्हा पुरुषाला भूक लागते त्याला अशिशिषति असा शब्द आहे. अन्नाची इच्छा करणारा — जिज्ञासु, युयुत्सु, पिपासु,
आणि नी धातुचा अर्थ आहे नेणे — नेत्र/नयन
∴ गायींना नेणाऱ्याला गोनाय/घोडे नेणाऱ्याला अश्वनाय
माणसे नेणाऱ्या राजाला वा सेनापतीला पुरुषनाय म्हणतात.
तसेच आपण खाल्लेल्या अन्नाला पुढे नेणाऱ्या जलाला अशनाय असे म्हणतात. त्यापासूनच अशना हे पाण्याचे नाव आहे.

कार्याच्या मागे कारण असतेच. अंकुर आहे म्हणजे बीज होतेच. या सृष्टीत कोणतीही गोष्ट अमूल (मूलाशिवाय) नसतेच. कार्य दिसते म्हणजे कारण असणारच. मग ते दृश्य असो वा अदृश्य! ते असतेच.

© www.madhaveeraghuveer.com

PROP :
With Best Compliments From

Advance Tax
PF payment



| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

तस्य क्व मूलं स्यात् अन्यत्र अन्नात्? एवमेव खलु सोम्य अन्नेन शुङ्गेन आपः मूलम् अन्विच्छ। सोम्य अद्भिः शुङ्गेन सन्मूलम् अन्विच्छ। सोम्य तेजसा शुङ्गेन सत् मूलम् अन्विच्छ। सन्मूलाः सोम्य इमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः॥

शरीर हे दृश्य आहे. ते कार्य आहे. त्याचे मूळ अन्नाशिवाय दुसरे काय असणार? खाल्लेल्या अन्नाचे तीन भाग होऊन त्यापासून विष्ठा, मांस व मन तयार होते हे आपण पाहिले. त्याचप्रमाणे खाल्लेल्या अन्नाचे पुरुषामध्ये वीर्य व स्त्रीमध्ये रज होते आणि दोघांच्या संयोगातून नवीन जीव/अपत्य जन्माला येते.

थोडक्यात शरीररूपी अंकुराचे मूळ ~~कार्य~~ कारण अन्न! अन्नाद् भवन्ति भूतानि। परंतु जेव्हा अन्न हे कार्य असेल तेव्हा त्याचे कारण आहे आप! कारण पाणी आहे म्हणूनच पृथ्वी बनली. आणि पुन्हा पाण्यापासूनच बीज अंकुरते, वाढते. पाणीच धान्यरूपाने दिसते. म्हणजे अन्नाचे मूळ पाणीच आहे.

आता पुढे आप हे जर कार्य मानले तर त्याचे कारण तेज आहे. कारण तेजातूनच पाण्याची उत्पत्ति झाली आहे.

आता तेज हे जर कार्य असेल तर त्यावरून मूळ कारणाचा



शोध घेतला तर ते आहे सत्!



सर्वच प्रजा, देहधारी, सृष्टी ही या सत् या मूळकारणापासून विकसित झाली आहे. सगळ्यांचा स्रोत एकच आहे - सत्तत्त्व! या सत् च्या अधिष्ठानावर सर्व निर्माण होते. त्यावरच टिके वाढते आणि त्यातच विलीन होते. कार्य कारणात विलीन होते. शरीर — अन्नात — मातीत — आपात — तेजात — सत मध्ये संपते.

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते
सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति।
सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति

With Best Compliments From
GABRIL INDUSTRIES
WORKS: Shed No- B-6;
Tel.: 020 66750582 /83 /84.

अथ यत्र एतत्पुरुषः पिपासति नाम तेज एव तत्पीतं नयते तद् यथा गोनायः अश्वनायः पुरुषनायः इत्येवं तत्तेज आचष्टे उदन्येति तत्र एतदेव शुङ्गम् उत्पतितं सोम्य विजानीहि न इदम् अमूलम् भविष्यति इति ॥५॥

माणसाला जेव्हा पाणी पिण्याची इच्छा होते म्हणजेच तहान लागते तेव्हा तो जे पाणी पितो ते तेज घेऊन जाते. कोरडा पडलेला घसा ओला होतो. आणि म्हणूनच उदकाला नेणारा म्हणून तेजाला उदन्या असे म्हटले जाते. गोनाय, अश्वनाय --- तेव्हा बाळा, सोम्य आता हा जो अंकुर निर्माण झाला आहे त्याचे कारण तू शोध. जाणून घे. शरीराचे कारण अन्न, अन्नाचे कारण पाणी, पाण्याचे कारण तेज व तेजाचे कारण सत्! या जगात मूळशिवाय (अमूलम्) कारणाशिवाय काहीच नसते.

तस्य क्व मूलं स्याद अन्यत्र अद्भ्य अद्भिः सोम्य शुङ्गेन तेजो मूलम् अन्विच्छ तेजसा सोम्य शुङ्गेन सन्मूलम् अन्विच्छ सन्मूलाः सोम्येमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठा यथा नु खलु सोम्य इमाः तिस्रो देवताः पुरुषं प्राप्य त्रिवृत् त्रिवृत् एकैका भवति तदुक्तं पुरस्ताद एव भवति अस्य सोम्य पुरुषस्य प्रयतो वाङ्मनसि सम्पद्यते मनः प्राणे प्राणस्तेजसि तेजः परस्यां देवतायाम् ॥६॥

पाण्याशिवाय त्याचे (अन्नाचे) मूळ काय असणार? शरीर हे अन्नाचे कार्य व पाणी हे तेजाचे कार्य आहे, पाण्याचे कारण तेज आहे आणि तेज हे कोणत्या कारणाचे कार्य आहे याचा शोध घे. सगळ्याचे मूळ कारण 'सत्' आहे. अरे बाळा, सर्व प्रजा, सर्व देहधारी हे सन्मूला आहेत. सगळ्याचे कारण सत्!

© www.madhavveeraghuveer.com

पूर्वी सांगितल्याप्रमाणे तीन देवता पुरुषामध्ये त्रिवृत त्रिवृत होऊन राहतात. (अन्नापासून-मन, आप - प्राण, तेज - वाणी)

पुरुष जेव्हा मरण पावतो तेव्हा त्याची वाणी मनामध्ये लीन होते. तेव्हा बोलायची इच्छा असून बोलता येत नाही. मग मन प्राणात विलीन झाल्यामुळे मनाचे व्यापार थांबतात. तो कोणाला ओळखत नाही आणि शेवटी प्राण तेजात विलीन होतो तेव्हा शरीर थोडे कोमट असते. गार पडत नाही. धुगधुगी असते. आणि शेवटी तेजही सत मध्ये (श्रेष्ठ देव) विलीन होते. म्हणजेच निघून आले तिथेच जाते. त्या सत पासून तो मनाला त्या सत्‌मध्ये तो टप्प्याटप्प्याने विलीन होतो आणि शेवटी तेजोरूप जीवात्मा परमात्म्यामध्ये विलीन होतो.

स य एषः (सत नामे) अणिमा ऐतदात्म्यम् इदं सर्वं तत् सत्यं सः आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति । भूय एव मा भगवान् विज्ञापयतु इति । तथा सोम्य इति ह उवाच ॥५॥

तो जो हा सत् नावाचा सूक्ष्म अणिमा आहे. तोच हे म्हणून दाखवता येणाऱ्या (दृश्य वस्तूंचा) विश्वाचा आत्मा आहे. तोच सत्य आहे. तोच परमात्मा आहे आणि श्वेतकेतु तूही तोच आहेस.

त्यावर श्वेतकेतु म्हणाला, बाबा मला नीट समजले नाही. पुन्हा समजावून सांगा. ठीक आहे, पुन्हा समजावतो. वडील म्हणाले.

तत् त्वम् असि। हे सामवेदाचे महावाक्य या मंत्रात आले आहे. ज्या सूक्ष्म सत् तत्त्वाने हे जग बनले आहे तेच या सृष्टीत प्रगट होते. बाळा श्वेतकेतु, तू देखील त्याच तत्त्वाचा आहेस.

सोने - अलंकार, सूत - वस्त्र, पाणी - तरंग बुडबुडे

याप्रमाणे सत् एकच असते. तेच विविध रूपे घेते. दिसायला वेगवेगळे असले तरी त्यामागचे तत्त्व एकच! सत्! तूही तेच आहेस

© www.madhaveeraghuveer.com

- नवम खण्ड -

यथा सोम्य मधु मधुकृतो निस्तिष्ठान्ति नानात्ययानां वृक्षाणां रसान्समवहारम् एकतां रस गमयन्ति ॥१॥

सोम्य, असं पहा, मधमाशा मध तयार करतात, त्या कशा? वेगवेगळ्या दिशांना असणाऱ्या झाडांवरुन त्या रस गोळा करतात व नंतर तो एकत्र करुन त्याचा मध बनतो.

भिन्न दिशांना, भिन्न ठिकाणी, भिन्न प्रकारच्या, आकाराच्या भिन्न रंग वासाच्या फुलांमधून गोळा केलेला रस एकत्र, एका ठिकाणी ठेवतात. त्या सर्वांचा मिळून एकच मध तयार होतो आणि मग त्यातून वेगवेगळ्या फुलांचा मध वेगळा काढता येत नाही त्याप्रमाणेच सर्व शरीरधाऱ्यांचे आत्मे एकाच सत् मध्ये विलीन होतात तेव्हा तिथे त्या सत् मध्ये काहीही भेद नसतो. ते सर्व एकच होतात.

ते तथा तत्र विवेकं न लभन्ते अमुष्य अहं वृक्षस्य रसः अस्मि अमुष्य अहं वृक्षस्य रसः अस्मि इत्येव खलु सोम्य इमाः सर्वाः प्रजाः सति सम्पद्य न विदुः सति सम्पद्यामह इति ॥२॥

सर्व फुलातील रस एकत्र स्वरुपात मध झाल्यावर तो वेगळा काढता येत नाही. मी अमुक वृक्षाचा, मी तमुक वृक्षाचा रस असा भेद तिथे उरतच नाही. तिथे सर्व रस एकच असतो. त्याचप्रमाणे बाळा, या सर्व प्रजा सत मध्ये विलीन झाल्यावर एकच होतात. त्या सत मध्ये विलीन झाल्या आहेत हे ही त्यांना कळत नाही. कारण त्यांना स्वतंत्र अस्तित्वच उरत नाही.

सर्वच प्राणी निद्राकाळी किंवा मृत्युकाळी आत्म्याच्या ठिकाणी लय पावतात. पण आपण लय पावलो हे देखील जाणत नाहीत. म्हणून लय पावल्यानंतर पुन्हा या लोकी आले म्हणजे वेगवेगळ्या योनीत जन्म घेतात. वाघ, सिंह, लांडगा,

© www.madhaveeraghuveer.com

२० मार्च २०२० या दिवशी उपनिषद वर्ग झाला.
त्यानंतर Pandemic मुळे अडीच वर्षे बंद.
१ जुलै २०२२ म्हणजे शुक्रवारी पुन्हा।
छांदोग्य उपनिषदातील अखेरच्या २ अध्यायांना सुरुवात केली.

उंदीर, डुक्कर, किडे! हे प्राणी ज्याच्यामध्ये लय पावून पुन्हा जन्म घेतात तो अणुएवढा आत्मा आहे तोच तू आहेस.

त इह व्याघ्रो वा सिंहो वा वृको वा वराहो वा कीटो वा पतङ्गो वा दंशो वा मशको वा यद्यद् भवन्ति तदा भवन्ति।

इथे या लोकात जे प्राणी वाघ, सिंह, लांडगा, डुक्कर, कीटक, पतंग डास वा चिलट, जे म्हणून काही असतात ते झोपेतून उठल्यावर परत तेच भाव धारण करतात. झोपेमध्ये शरीरधारी सत्‌मध्ये जातो, त्यावेळी त्या सर्व प्राण्यात भेद राहत नाही पण जागे झाल्यावर पूर्व स्मृति जागी होते व पुन्हा भान येते.
मंगळागौर जागवल्यानंतर कधी कधी सासू सुना अगदी शेजारी क्वचित मिठीत सुध्दा झोपतात. ससा सिंहाच्या कुशीत झोपतो.
मृत्युनंतरही सर्व सत्‌ला मिळतात. पण आपल्या वासना शिल्लक ठेवून मेले तर पुन्हा त्या त्या वासनाप्रमाणे जन्म मिळतो. आणि जर वासना शिल्लक राहिल्या नाहीत तर सत्‌ शी एकरूप होतो.

स य एषः अणिमा ऐतदात्म्यम् इदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान् विज्ञापयतु इति तथा सोम्य ह उवाच॥ ३॥

तो जो हा अणिमा सूक्ष्म तत्व आहे त्याच्यापाशीच हे सर्व दृश्य जग तादात्म्य पावलेले आहे. म्हणजे जे जे दिसते आहे ते सर्व मूळ स्वरूपात अणिमाच आहे. हा अणिमा म्हणजेच सत्य म्हणजेच परमात्मा, म्हणजेच तू ही तोच आहेस. कळले का?
नाही भगवन, मला नाही नीट समजले. पुन्हा समजावून सांगा
ठीक आहे.

© www.madhaveeraghuveer.com

६.१०



दशम खण्ड (उद्दालक)

इमाः सोम्य नद्य पुरस्तात्प्राच्यः स्यन्दन्ते पश्चात् प्रतीच्यस्ताः समुद्रात् समुद्रमेव अपियन्ति स समुद्र एव भवति ता यथा तत्र न विदुः इयम् अहम् अस्मि इयम् अहम् अस्मि इति ॥४.१॥

दिसायला विविधता असली तरी ती एकातूनच आलेली आहे व एकातच विलीन होते. वेगवेगळ्या दिशेने वाहणाऱ्या नद्या म्हणजे खरं तर एकाच समुद्राचे रूप आहेत. जलचक्र — पाणी - वाफ - ढग - वर्षा । म्हणजेच त्या समुद्रातनच उत्पन्न होऊन समुद्राला जाऊन मिळतात.

प्रत्येक नदीचे रूप, नाम, स्वभाव वेगळा असतो, वेगळे अस्तित्व असते. परंतु जेव्हा ती समुद्राला जाऊन मिळते, तेव्हा तिचे नाम, रूप, अस्तित्व संपून जाते. म्हणजे नदी होण्यापूर्वी तिला अस्तित्व नव्हते नंतरही नाही. अस्तित्व हे काही काळापुरते असते त्याच प्रमाणे एका सत मधून हे सर्व जीव शरीर धारण करतात. मध्ये विविधता दिसली तरी असत नाही, पुन्हा सत मध्ये विलीन होतात.

एवमेव खलु सोम्य इमाः सर्वाः प्रजाः सत आगम्य न विदुः सत आगच्छामहे इति त इह व्याघ्रो वा सिंहो वा वराहो वा कीटो वा पतङ्गो वा दंशो वा मशको वा यद् यद् भवन्ति तदा भवन्ति ॥२॥ स यः एषः अणिमा ऐतद् आत्म्यम् इदं सर्वं तत् सत्यं, सः आत्मा तत् त्वम् असि श्वेतकेतो। इति।

MVAT for August
ESI Payment



भूयः एव मा भगवान् विज्ञापयतु । इति ।
तथा सोम्य इति ह उवाच ॥३॥

त्या नद्यांना (जरी त्या समुद्रापासूनच आल्या असल्या तरी) माहीत नसते की त्या खऱ्या स्वरूपात समुद्र आहेत. त्याचप्रमाणे हे बाळा, या सर्व प्रजा सत्‌पासून आल्या आहेत. खरे स्वरूप सत्‌च आहे. विविधता ही वरवरची आहे, तात्पुरती आहे. या जगात वाघ, सिंह, वराह, कीटक, पतंग, डास वा चिलट म्हणून जन्म घेतात व त्या योनिप्रमाणे वागतात. त्यांना हे माहीतच नसते की ते सत्‌पासून निर्माण झाले आहेत व सत् मध्येच जाणार आहेत.

तो जो अणिमा (सूक्ष्म तत्त्व) आहे. त्याच्याशी हे सर्व एकात्म्य पावले आहे. हे सूक्ष्म तत्त्व म्हणजेच सत्य म्हणजेच आत्मा आणि हे श्वेतकेतू, तो आत्मा म्हणजे तूच आहेस.

तत् त्वम् असि ।



एकादश खण्ड (मंत्र-३)

(१) अस्य सोम्य महतो वृक्षस्य यो मूले अभ्याहन्यात् जीवन् स्रवेत् यः मध्ये अभ्याहन्यात् जीवन् स्रवेत् यः अग्रे अभ्याहन्यात् जीवन् स्रवेत् सः एषः जीवेन आत्मना अनुप्रभूतः पेपीयमानः मोदमानः तिष्ठति ॥१॥

© www.madhaveeraghuveer.com

१५ जुलै २०२२

OCTOBER 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

भाद्रपद कृ. ४ संवत २०६९
सोमवार २३/९/२०१३

SEPTEMBER 23 MONDAY

जोपर्यंत आत्मा आहे तोपर्यंत लहान मोठ्या आघाताने फारसे नुकसान होणार नाही.

अरे बाळा, हा समोर मोठा वृक्ष दिसतो आहे ना, त्याच्या मुळांपाशी घाव घातला तर ते झाड जिवंत राहील पण त्यातून रस स्रवेल. जर मध्यावर घाव घातला तरी झाड जिवंत राहील आणि रस स्रवेल. कोणी अग्रभागावर घाव घातला तरी ते झाड जिवंत राहील, पण त्यातून रस स्रवेल.

जोपर्यंत वृक्ष जिवंत आहे म्हणजेच आत्म्याने युक्त आहे तोपर्यंत तो वृक्ष मुळांच्या माध्यमातून पाणी पित आनंदाने जगेल. आत्मा असेपर्यंत वृक्ष आघात पचवून सुरक्षित राहील.

② यत अस्य एकां शाखां जीवो जहाति अथ सा शुष्यति, द्वितीयां जहाति अथ सा शुष्यति, तृतीयां जहाति अथ सा शुष्यति, सर्वं जहाति सर्वः शुष्यति ॥२॥

जर या वृक्षाच्या एका शाखेला जीव सोडून देईल तर ती सुकून जाईल, दुसऱ्या शाखेला, तिसऱ्या शाखेला सोडून देईल तर ती सुकून जाईल. सर्व झाडाला जीव सोडून देईल तर ते सर्व झाड सुकून जाईल. त्या जीवामुळे, त्या आत्म्यामुळे झाड जिवंत राहते.

© www.madhaveeraghuveer.com

(३) एवमेव खलु सोम्य विद्धीति होवाच जीवापेतं वाव किलेदं म्रियते न जीवो म्रियत इति स य एषोऽणिमैतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान् विज्ञापयत्विति तथा सोम्येति ह उवाच ॥३॥

बाळा, माणसाच्या, शरीरधाऱ्याच्या बाबतीत हे अगदी असेच होते. जीव ज्यावेळी शरीराला सोडून जातो त्याचवेळी शरीर मरते. जीव मरत नाही. हे ध्यानात घे. हा जो अणिमा आहे, त्याच्याशी एकात्म पावूनच हे विश्व जगते. हे विश्व अस्तित्वात रहाते. तोच सत्य आहे. तोच तू आहेस. तोच आत्मा आहे — तत्वमसि
कळले का तुला?

परंतु श्वेतकेतुच्या मनात अजूनही गोंधळ होता. म्हणून तो म्हणाला,
भगवान् मला पुन्हा समजावून सांगा —
ठीक आहे, सांगतो — असे उद्दालक आरुणि म्हणाले.

©www.madhaveeraghuveer.com

२२ जुलै २०२२

OCTOBER 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

भाद्रपद कृ. ६ संवत २०६९
बुधवार २५/९/२०१३

SEPTEMBER 25 WEDNESDAY

## — द्वादश खण्ड —

न्यग्रोधफलमत आहरेतीदं भगव इति भिन्द्धीति। भिन्नं भगव इति। किमत्र पश्यासि? इति। अण्व्य इव इमाः धानाः भगव इति। किमत्र पश्यासि इति? न किञ्चन भगव इति।

- वडीलांनी आता प्रात्यक्षिक दाखवायचे ठरवले.
बाळा, त्या समोर दिसणाऱ्या वडाच्या झाडाचे एक फळ घेऊन ये.
हे बघा, हे आणलं फळ।
बरं आता त्याचा छेद घे.
घेतला छेद। फोडलं भगवन्!
आता काय दिसतंय तुला?
अगदी लहान अणुप्रमाणे दाणे दिसताहेत.
आता त्या बारीक दाण्यांचा छेद घे.
घेतला. भगवन्!
आता काय दिसतंय तुला?
भगवन् काहीच दिसत नाही।

वडाच्या फळामध्ये ज्या बारीक कण्या/दाणे दिसतात. त्या प्रत्येकात एक प्रचंड वटवृक्ष वाढवण्याची क्षमता आहे. पण त्या बारीक कणाचा छेद घेतला असता, त्यात काही वटवृक्ष किंवा त्याची आकृती दिसत नाही. पण त्या एका कणामधूनच प्रचंड वटवृक्ष विकसित होत असतो. होणार असतो.

© www.madhaveeraghuveer.com

तं ह उवाच यं वै सोम्य एतम् अणिमानं न निभालयसे एतस्य वै सोम्य एषः अणिम्नः एव महान् न्यग्रोधः तिष्ठति। श्रध्दस्व सोम्य इति ॥२॥

तेव्हा उद्दालक आरुणी पुत्राला (श्वेतकेतुला) म्हणाले — बाळा, तू या कणांमधील अणिमाला बघू शकत नाहीस, ते तुला दिसत नसले तरी या अणिमाचाच हा महान वटवृक्ष समोर उभा आहे. म्हणजे या एवढ्या शाखा, पानांच्या, फळांच्या जो भला मोठा वटवृक्ष वाढलेला आहे, तेव्हा या कणांमध्येच, अणिमा मध्ये जरी काही दिसले नाही, तरी श्रध्दा ठेव की, त्यातच वृक्षाचे बीज आहे.

त्याचप्रमाणे प्रत्येक वस्तूमध्ये जरी ब्रह्म दिसत नसले तरी त्या एका ब्रह्मानूनच हे सर्व ब्रह्मांड निर्माण झाले आहे यावर विश्वास ठेव.

स य एषः अणिमा एतद् आत्म्यम् इदं सर्वम् तद् सत्यं स आत्मा तत् त्वम् असि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान् विज्ञापयतु इति। तथा सोम्य इति ह उवाच।

प्रत्येक गोष्टीच्या बीजरूपात ही असणारी पण न दिसणारी जी शक्ती आहे ती अणिमा। त्या अणिमाचेच हे एतदात्मक रूप (त्याचेच बनलेले) आहे. तेच सत आहे. तेच आत्मा-परमात्मा आहे व तेच तू आहेस. सर्व वस्तूमध्ये त्या परमात्म्याचीच शक्ती आहे व तेच त्याचे खरे स्वरूप आहे. तू सुध्दा तुझ्या खऱ्या स्वरूपात म्हणजे परब्रह्मच आहेस.

With Best Compliments From

पुन्हा समजावून सांगा. बरं सांगतो.

गजेंद्र पतंगे आंबेवाले
© www.madhaveeraghuveer.com

## त्रयोदशः खण्डः।

लवणम् एतद् उदके अवधाय अथ मा प्रातः उपसीदथाः इति। सह तथा चकार तं ह उवाच यत् दोषा लवणम् उदके अवाधाः अङ्ग तत् आहर इति। तत् ह अवमृश्य न विवेद॥१॥

श्वेतकेतुला हे पटत नव्हते की गोष्ट असून दिसत नाही, कळत नाही. असे कसे?

वडीलांनी श्वेतकेतुला बोलावले, व एका भांड्यात पाणी आणि काही मिठाचे खडे आणायला सांगितले. ते म्हणाले, बाळा हे खडे या पाण्यात टाक आणि उद्या सकाळी ते घेऊन ये.

वडीलांनी सांगितल्याप्रमाणे श्वेतकेतुने केले. एका भांड्यात पाणी घेऊन त्यात खडे ठेवले. व ते भांडे रात्रभर एका बाजुला ठेवले. दुसऱ्या दिवशी श्वेतकेतु वडीलांकडे गेला. तेव्हा वडील म्हणाले, ते मिठाचे खडे आण बरं!

श्वेतकेतुने भांड्यात हात घालून चाचपले पण त्याला खडे आढळले नाही त्यामुळे पाण्यातून बाहेर काढता आले नाहीत.

यथा विलीनमेव अङ्ग अस्य अन्तात् आचाम इति। कथम् इति। लवणम् इति। मध्यात् आचाम इति।
" " । " " । अन्तात् " "
" " । " " । अभिप्रास्य एतद् अथ मा उपासीदथाः इति। तत् ह तथा चकार। तत् शश्वत् संवर्तते। तं ह उवाच, अत्र वाव किल सत्

© www.madhaveeraghuveer.com

**SEPTEMBER**
**28**
**SATURDAY**

भाद्रपद कृ. ९ संवत २०६९
शनिवार २८/९/२०१३

AUGUST 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

सौम्य न निभालयसे, अत्र एव किल इति।

पाण्यात मीठ विरघळले. दिसत नाही. दिसत नाही म्हणजे ते नाही का? तर आहे. मग त्याचे अस्तित्व कसे कळणार? चाखून पाहिल्यावर त्यातील मिठाचे अस्तित्व कळले.

वडील म्हणाले, सापडतेय का मीठ? नाही ना? विरघळले असेल. मीठ आहे का नाहीसं झाले?

बाळा, आता या पाण्याच्या वरच्या भागाची चव घेऊन बघ. कशी आहे? खारट! मग आता मधल्या व एकदम खालच्या भागाचीच चव घे. ती देखील खारटच आहे.

(म्हणजेच मिठाचे अस्तित्व सर्व पाण्यात असते.)

आता हे पाणी फेकून देऊन तू माझ्याजवळ ये. तेव्हा आरुणि म्हणाले

बाळा, त्या पाण्यात सर्वत्र, सदैव, सारखेच मीठ होते. परंतु दिसले नाही म्हणजे नव्हते असे समजू नये. चव घेतल्यावर तुला पटले असलेच की

**SUNDAY, SEPTEMBER 29** भाद्रपद कृ. १० संवत २०६९

सर्व पाण्यात मिठाचे अस्तित्व होते मग त्याचप्रमाणे जगातील सर्व वस्तुमध्ये सत् चे अस्तित्व असतेच दिसत नाही तरी ते तिथे निश्चित असतेच.
तिथे असतेच बर का!

© www.madhaveeraguveer.com

स: य: एष: अणिमा ऐतदात्म्यम् इदं सर्वं तत् सत्यम्। स: आत्मा तत् त्वम् असि श्वेतकेतो इति। भूय: एव मा भगवान् विज्ञापयतु इति। तथा सोम्य इति ह उवाच।

तो जो दिसत नाही, पण असतो तो अणिमा! हे दिसणारे सर्व त्याच्याशी एकात्म झाले आहे. तो अणिमा म्हणजेच सत्य! तोच (परम) आत्मा आणि तू ही तोच (परम) आत्मा आहेस. खरंच श्वेतकेतो! भगवन मला नीट समजले नाही. पुन्हा सांगा। ठीक आहे. सांगतो---

– चतुर्दश खण्ड –

यथा सोम्य पुरुषं गान्धारेभ्य: अभिनद्धाक्षम् आनीय तं तत: ~~अतिजने~~ विसृजेत् स: तथा प्राङ्ग वा उदङ्ग वा अधराङ्ग (अतिजने) वा प्रत्यङ्ग वा प्रध्मायीत। अभिनद्धाक्ष: आनीत: अभिनद्धाक्ष: विसृष्ट: ॥१॥

अरे बाळा, एखाद्या पुरुषाला गान्धार देशातून डोळे बांधून आणले आणि अगदी निर्जन अशा ठिकाणी त्याला सोडून दिले तर तो पूर्व, उत्तर, पश्चिम किंवा दक्षिण दिशेकडे तोंड करून ओरडेल,

"अहो कुणी आहे का? मला इथे डोळे बांधून आणले आहे आणि या निर्जन ठिकाणी सोडून दिले आहे.

©www.madhaveeradhuveer.com

२९ जुलै २०22



षष्ठ अध्याय, चतुर्दश खंड

तस्य यथा अभिनहनं प्रमुच्य प्रब्रूयात- एतां दिशं गन्धारा एतां दिशं व्रज इति। सः ग्रामात ग्रामं पृच्छन् पण्डितः मेधावी गन्धारान् एव उपसम्पद्येत एवम् एव इह आचार्यवान पुरुषः वेद। तस्य तावत एव चिरं यावत विमोक्ष्ये अथ सम्पत्स्ये इति।

त्याचा आरडाओरडा ऐकून तिथून जाणारा कुणीतरी कनवाळू मनुष्य त्याची बंधने सोडून त्याला सांगेल- या या दिशेला गांधार देश आहे. या दिशेने जा. तेव्हा तो बंधमुक्त माणूस योग्य दिशेने जाऊ लागेल व गावागावातून विचारत विचारत वाट पुसत जाईल. आणि असे करत करत तो पंडित, बुद्धिमान पुरुष गांधार देशाला पोहोचेलच.

आपणही असेच आहोत. आपल्यालाही ममत्वाची उपाधिची बंधने आहेत. घर, संसार, मुले बाळे, नातेवाईक, विषयोपभोग--- पापपुण्यरूप चोरांकडून आम्हाला कुठेतरी दुसरीकडे संकटात आणून टाकले जाते. त्रस्त होतो, घाबरतो, धडपडतो[?].

मात्र जो शहाणा, विवेकी असेल तो याने[?] या परिस्थितीच्या कारणांचा विचार करून, त्याच्या पुण्याईने जर त्याला जाणकार गुरु भेटेल तर बंधनातून मुक्त होऊन स्वस्थानी पोहोचण्यासाठी मार्गदर्शन मिळेल.

तू कोण, कुठून आलास? या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याची खरी जिज्ञासा असेल तर स्वामी आचार्य मार्ग दाखवतील. मात्र वाटेत मोहात अडकायचे नाही- ज्याचे देहाचे बंधन सुटेल त्यालाच घरी पोहोचण्याची ओढ लागेल. स्वरूपज्ञान- मी ब्रह्म आहे हे समजेल.

With Best Compliments From
ARYAN WATER SUPPLIERS
All Type of civil works & Hire Work Machinary.

हस्तामलक स्तोत्र —

आत्माराम —

स य एषोऽणिमा ऐतदात्म्यम् इदं सर्वं तत् सत्यं स आत्मा। तत् त्वम् असि श्वेतकेतो। इति। भूय एव मा विज्ञापयतु इति। तथा सोम्य। इति ह उवाच॥

हा जो अणिमा आहे, त्याच्याशी हे सर्व तादात्म्य पावले आहे. तो अणिमा म्हणजे सत्य-तोचि परमात्मा! आणि तोच आत्मा आणि तोच तूही आहेस.
भगवन् मला पुन्हा समजावून सांगा
ठीक आहे

© www.madhaveeraghuveer.com

पञ्चदशः खण्डः ।

पुरुषं सोम्योतोपतापिनं ज्ञातयः पर्युपासते जानासि मां जानासि मामिति। तस्य यावत् न वाङ्मनसि सम्पद्यते मनः प्राणे, प्राणस्तेजसि तेजः परस्यां देवतायां तावज्जानाति ॥१॥

उपतापी - खूप ताप आलेला / मरणासन्न---
एखाद्या पुरुषाला खूप ताप आला असेल वा तो मरणासन्न झाला असेल तर त्याचे नातेवाईक (ज्ञातयः) त्याच्याभोवती जमा होतात व विचारतात? मला ओळखले का? जोपर्यंत त्याची वाणी मनात, मन प्राणात, प्राण तेजात विलीन झाले नसतील, तेज परदेवतेत विलीन झाले नसेल तोपर्यंत तो त्यांना ओळखतो.

अथ यदास्य वाङ्मनसि सम्पद्यते, मनः प्राणे, प्राणः तेजसि तेजः परस्यां देवतायामथ न जानाति।

मग जेव्हा त्याची वाणी प्रमनात, मनात, मन प्राणात, प्राण तेजात व तेज परमात्म्यात विलीन होते, त्यावेळी तो भोवतालच्या, जवळच्या माणसांना ओळखत नाही.

स य एषः अणिमा ऐतदात्म्यम् इदं सर्वं तत् सत्यम्। सः आत्मा त्वम् असि श्वेतकेतो इति। भूय एव विज्ञापयतु) इति। तथा सोम्य इति ह उवाच।

तोच हा अणिमा - सर्वात सूक्ष्म तत्व सर्वांशी तादात्म्य पावले. तेच सूक्ष्म तत्व म्हणजेच सत हेच आत्मा, तोच तू आहेस.
पुन्हा समजावून सांगा
सांगतो.

©www.madhaveeradhuveer.com

With Best Compliments From
KHALIL SHAIKH
S. No. 12, Laxmi Nagar,

षोडशः खण्डः

पुरुषं सोम्य उत हस्तगृहीतम् आनयन्ति । अपहार्षीत्
स्तेयम् अकार्षीत् परशुम् अस्मै तपत इति ॥
सः यदि तस्य कर्ता भवति ततः एवम् अनृतम्
आत्मानं कुरुते सः अनृताभिसन्धः अनृतेन
आत्मानं अन्तर्धाय परशुं तप्तं प्रतिगृह्णाति ।
सः दह्यते अथ हन्यते ।

अग्निदिव्य ही कृती आपल्याला परिचित आहे.
(सिता) माणूस खरे बोलतो आहे की खोटे
यासाठी त्याला दिव्य करायला लावत. परशु लाल
होईपर्यंत तापवीत व त्याला हातने धरायला
लावत. जर तो खोटे (अनृत) बोलत असेल तर
त्याचे हात भाजत असत पण खरे बोलणाऱ्यावर
आवरण घालून सत्य त्याला वाचवते अशी
समजूत होती.
उकळत्या तेलात हात घालून नाणे काढणे.
हल्ली Lie detector Test — Narcotics

अथ यदि तस्य अकर्ता भवति तत एव सत्यमात्मानं
कुरुते स सत्याभिसन्धः सत्येनात्मानम् अन्तर्धाय
परशुं तप्तं प्रतिगृह्णाति स न दह्यतेऽथ मुच्यते ॥२॥

जर तो चोरीचा अकर्ता असेल, म्हणजे त्याने चोरी केली
नसेल तर तो स्वतःला सत्य (सिद्ध) करतो. तो
सत्याशी जोडला जातो. स्वतःवर सत्याचे आच्छादन घालतो,
आणि मग तो तापलेल्या परशुला हातात घेतो. सत्याचे
कवच लाभल्याने त्याला भाजत नाही. आणि मग

© www.madhaveeraghuveer.com

राजाचे शिपाई त्याला सोडून देतात.

हे कवच चर्मचक्षुंना दिसत नसले तरी असतेच. त्याचप्रमाणे परमात्मा, प्रत्येकातील सत् तत्त्व दिसत नसले तरी असते, एवढे मात्र निश्चित.

स: ~~सस~~ यथा तत्र न अयाहयेन ऐतदात्म्यम् इदं सर्वम्। तत् सत्यम्। स: आत्मा। तत् त्वम् असि श्वेतकेतो॥ तत् ह अस्य विजज्ञौ इति। विजज्ञौ इति ॥३॥

तो त्या सत्याच्या अदृश्य आवरणामुळे भाजण्यापासून वाचतो. हे सर्व दिसणारे जग एतदात्म्यरूप आहे. तोच सत्य आहे. आत्मा आहे. श्वेतकेतो, तोच तू आहेस. आता श्वेतकेतुला हे सारे बोलणे समजले. शंका दूर झाल्या.

तो परमात्मा दिसत नसला तरी त्याच्याच आधाराने हे जग चालते. तोच या विश्वात भरून राहिला आहे. तोच शरीरातही वास्तव्य करतो. तोच तू आहेस.

त्या सत्याशी अशा रीतीने तो अभिसन्ध होतो म्हणजे मी परब्रह्म आहे अशी प्रचीती येणे म्हणजे परब्रह्मच होणे.

 त्याला जन्म मृत्यु-फेरे नाहीत. 

त्याला कळून चुकते की मी व तो एकच आहे-दोन नाही.

सर्व प्रजा सत्‌पासूनच आल्या आहेत — सन्मूला:
सत्‌च त्या सर्वांचा आधार आहे.

सत् व प्रजा यात काहीच अंतर नाही. त्यांच्यात तादात्म्य आहे. हा सारा सत्‌चाच विलास आहे.

मृत्तिका आणि घट
सोने आणि अलंकार.

त्याचप्रमाणे सताशिवाय काहीही नाही. आणि तेच तू आहेस

© www.madhavveeraghuveer.com

TDS payment of Sept.



आधार तीन प्रकारचा असतो — अधिकरण सप्तमी
त, इ, आ, प्रत्यय. — (१) औपश्लेषिक आधार
डब्यात लाडू आहे.
टेबलावर फुलदाणी आहे.
श्याम पलंगावर बसला आहे.
परंतु हे सदासर्वदा, सर्व काळ व्यापत नाही.
(२) काही भाग काही काळापुरता व्यापतो.
वैषयिक आधार - मुलगा आईवर प्रेम करतो.
(आई असेल तर)
सचिनचे क्रिकेटवर प्रेम आहे.
(३) अभिव्यापक आधार - पूर्ण व्यापून असणे.
गूळ आणि त्याची गोडी
चंदन " त्याचा सुगंध
एकमेकांपासून वेगळे करता येत नाही.
उपनिषदार्थ कौमुदी — — — —
कारण सत् हे सर्व ठायी। सूक्ष्मतेने भरून राही।
त्याविणे वस्तू नाही। अन्य काही विश्वामध्ये॥ ५७
तेच आत्मा तेची सत्य। अमूर्त तेची मूर्तिमंत।
संशय न धरी मनात। तेच तू आहेस रे॥ ५८॥
— वरदानंद भारती

© www.madhavieeraghuveer.com

१२ ऑगस्ट २०२२



सातवा अध्याय संक्षिप्त पद्धतीने केला आहे

(२६ खंड) सप्तम: अध्याय: — प्रथम खंड १ ते १२ खंड

सनत्कुमार व नारद यांचा संवाद- नारदांना आत्मज्ञानाची आस लागली होती. त्यांच्याकडे अपरा विद्या (इतिहास पुराणे वेद, गणित, व्याकरण, षडंग, कल्प, छंद) पुष्कळ होत्या परंतु आत्मविद्या नव्हती. आत्मविद्या शोकाच्या पलीकडे नेते म्हणून ते सनत्कुमारांना विनंती करतात. सनत्कुमार म्हणतात हे सर्व नाम आहे; त्याला मर्यादा आहे. नामापेक्षा वाणी, वाणीपेक्षा मन, मनापेक्षा संकल्प व संकल्पापेक्षा चित्त व्यापक आहे. चित्तापेक्षा ध्यान व ध्यानापेक्षा विज्ञान श्रेष्ठ आहे. विज्ञानापेक्षा बल, बलापेक्षा अन्न, अन्नापेक्षा पाणी, पाण्यापेक्षा तेज, तेजापेक्षा वायु, वायुपेक्षा आकाश श्रेष्ठ आहे.

त्रयोदश: खण्ड:

स्मर: वाव आकाशात् भूय: । - - - - स्मरम् उपास्स्व इति ॥

अध्यात्ममार्गामध्ये जेवढे सूक्ष्म तेवढे श्रेष्ठ! स्मरण/स्मृती हा अंत:करणाचा धर्म आहे. भोगाचे, समाजाचे, विषयाचे स्मरण असल्यानेच व्यवहार चालतात. पशु-पक्षींना ओळखता येते. परंतु स्मरणापेक्षा आशा श्रेष्ठ आहे. (१४ वा खंड). अप्राप्त वस्तूचे नाम आशा आहे. आशेनेच मनुष्य काम करतो — Motivation हवे-- आशेहून श्रेष्ठ काही आहे का?

१५ वा खंड — आशेपेक्षा प्राण श्रेष्ठ आहेत. प्राणच शक्ती प्रदान करतो. प्राण सर्व नात्यांचा आधार आहे. नात्यातील व्यक्तींचा अपमान सहन करता येत नाही. अपमान ही हत्याच असते. (वडीलांच्या फोटो फ्रेमवर) आदर! जिवंत आहेपर्यंत व्यक्ती असते. मृत्युनंतर Body बनते. (∴ प्राण महत्वाचे) ब्रह्मापासून स्तम्बपर्यंत (लहान की राणु) संपूर्ण जगाचा प्राण म्हणजे आत्मा आहे.

खंड - १६ - जो सत्य जाणतो तोच अतिवादी होतो.

(परमार्थ सत्य आत्म्याचे विज्ञान ...

With Best Compliments From
Rajesh Jogdand

खंड/१७व१८ जीवनाबद्दलचा दृष्टिकोन जितका व्यापक व सखोल बनत जातो, तितका साधक आत्मस्वरूपाच्या जवळ जातो ∴ साधकाने सर्व बाजूंनी जीवनाची उपासना करावी

१८वा खंड — जेव्हा ज्ञान होते तेव्हा मनुष्य सत्यच बोलतो। ∴ ज्ञान आणले पाहिजे. ज्ञानी पुरुष जे बोलेल त्याला साधकाने महत्त्व द्यायला हवे. सावधानतेने ऐकायला हवे.

सहज बोलणे हेच उपदेश —

खाल्लेले अन्न जसे पचावे लागते तसे मिळवलेले ज्ञान मननाने आत्मसात व्हावे लागते. मनन म्हणजे चिंतनशीलता। चिंतनातूनच निदिध्यास निर्माण होतो — त्यातून साक्षात्कार होतो

खंड - १९, २०, २१, २२,

श्रद्धेमुळेच मनन होते. श्रद्धा म्हणजे आस्तिक्यबुद्धी!

सत्संगति आणि भगवंताचे अनुसंधान यामुळे 'श्रद्धा' निर्माण होऊ शकते. निष्ठा व श्रद्धा यांचा जवळचा संबंध आहे. श्रद्धा शुद्ध होत जाऊन एकांतिक झाली की निष्ठा निर्माण होते. निष्ठा म्हणजे तत्परता!

आत्मा सत्य आहे असे वाटणे ही श्रद्धा! तर आत्म्याशिवाय दुसरे काहीच सत्य नाही असे वाटणे ही निष्ठा! निष्ठा म्हणजे परमार्थाचा प्राण असून सर्व साधनांचे पर्यवसान आहे. ज्ञान + भक्ति ⟶ निष्ठा - निष्ठेने कृती व कृतीने निष्ठा उत्पन्न होते — परस्पर संबंध.

दृश्य वस्तु स्वतः अपूर्ण असल्याने त्यातून पूर्ण सुख प्राप्त होणे शक्य नाही. अनुभव फक्त तेवढाच । तरी मनुष्य दृश्याच्या नादी लागतो. हेच अविद्येचे लक्षण आहे.

अविद्येतून आशा निर्माण होते. जिला अंतःकरणाच्या बाहेर काढणारा परमार्थाचा अधिकारी होतो. — हेच वर

© www.madhaveeraghuveer.com

१६ सप्टेंबर २०२२



खंड २३, २४, २५, २६, ~~२७~~ ---

(२३) यः वै भूमा तत्सुखम् । न अल्पे सुखमस्ति ।
त्या भूमा (निरतिशय) ला जाणण्याची जिज्ञासा - याच्यापेक्षा अधिक (मोठे) काहीही नाही. ब्रह्मांडाचा स्वामी जो बनतो, त्याला कशाची इच्छा असणार? इतरांजवळ माझ्यापेक्षा जास्त आहे ही भावना दुःखदायक असते. स्वतः परब्रह्मच झाल्यावर दुःख कसले?

(२४) भूमा आपल्याच महिम्यामध्ये प्रतिष्ठित आहे. तो स्वयंभू, स्वतंत्र, स्वप्रतिष्ठित आहे. परब्रह्माचा मोठेपणा बाह्य गोष्टींवर अवलंबून नाही. ∴ वा न महिम्नि ।

(२५) एकमेवाद्वितीय परब्रह्म! स्वराट् तोच, कामचारः - इच्छेनुसार गमन आत्मरति, आत्मक्रीड । मिथुनासाठी रहित. । आत्मानंद तोच आहे

(२६) आत्मैक्य होण्याचा नारदांचा उद्देश पूर्ण झाला: हा प्रवास — नाम - वाक् — मन — संकल्प - चित्त, ध्यान, विज्ञान - बल — अन्न — जल — तेज — आकाश — स्मरण — आशा — प्राण — विज्ञान - मनन — श्रध्दा — निष्ठा — कृति — सुख — भूमा पर्यंत झाला. भूमाच स्वतः तर आत्मा आहे. एका परमात्म्याखेरीज काहीच नाही.

तदेष श्लोको न पश्यो मृत्युं पश्यति न रोगं नोत दुःखतां सर्वं ह पश्यः पश्यति सर्वमाप्नोति सर्वशः इति स एकधा भवति त्रिधा भवति पञ्चधा सप्तधा नवधा चैव पुनश्च एकादशः स्मृतः शतं च दश चैकश्च सहस्राणि च विंशतिराहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः स्मृतिलम्भे सर्वग्रन्थीनां विप्रमोक्षः तस्मै मृदितकषायाय तमसस्पारं दर्शयति. भगवान्सनत्कुमारः तं स्कन्द इति आचक्षते तं स्कन्द इति आचक्षते ॥ ७.२६.२॥

विप्रमोक्षः — विशेष प्रकारची मुक्ती
मृदितकषाय — मालिन्या संबंधाने आलेली मलिनता.

© www.madhaveeraghuveer.com

बंधनापासूनि उकलल्या गाठी

**OCTOBER**

**11**

**FRIDAY**

आश्विन शु. ७ संवत २०६९

शुक्रवार ११/१०/२०१३

| SEPTEMBER 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

शब्दज्ञानापासूनच्या आत्मज्ञानापर्यंतचा प्रवास आहे

जो आत्मरूपाने पाहतो तो मृत्युला पहात नाही. रोगाला / दुःखाला पहात नाही म्हणजे भय उरत नाही. देहाचे रोग किंवा मनाची सुखदुःखे त्याला जाणवत नाहीत. सदैव तो सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव घेत असतो. तो अमरच असतो. तो आनंदातच असतो.

सर्वांना तो आत्मरूपाने पहात असल्याने तो सर्वांना प्राप्त करतो. म्हणूनच तोच सर्व होतो. तोच पाच, सात, नऊ होतो. अकरा, शंभर, दहा, हजार व वीस तोच होतो.

सर्वभूतस्थमात्मानं -----

शुद्ध आहाराने अंतःकरण शुद्ध होते. अंतःकरण शुद्ध झाले की स्मृति स्थिर होते. ती स्थिर झाली की सर्व ग्रंथींचा नाश होतो.

[भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥
प्रकाशमय आत्म्याचे दर्शन झाले असता हृदयग्रंथींचा नाश होतो. सर्व संशय फिटतात व कर्मबंधन रहात नाही.]

अशा रीतीने सनत्कुमारांनी नारदांना अविद्येच्या पार नेले. त्यापूर्वी त्यांच्या अंतःकरणावरील रागद्वेषाचे डाग ज्ञानवैराग्यरूपी साबणाने (Detergent, Cleanser) नष्ट झाले होते. ऐहिकतेचे मालिन्य गेले. मोक्षप्राप्ति झाली.

सर्व इंद्रियांचे आहार सात्त्विक असायला हवेत. त्याने सत्त्वशुद्धि होते त्यामुळे आत्मस्वरूपाची स्मृती जागृत होते. दृढ होते. जन्मजन्मांतरीच्या गाठी सुटतात. मी, देह, परिवार उपाधि, कुल या गाठी सुटतात. गुंता मोकळा होतो. अज्ञान अंधकाराच्या पलीकडे सनत्कुमारांनी नेले. ∴ त्यांना स्कंद ही सन्माननीय पदवी मिळाली. गुरुकृपेने परब्रह्मापर्यंत पोहोचता येते.

इथे गुरु - सनत्कुमार व शिष्य नारद आहेत.

© www.madhavaeeraghuveer.com

२३ सप्टेंबर २०२२

## - अष्टम अध्याय - (१५ खंड)

### प्रथम खण्ड

सहाव्या व सातव्या अध्यायात ब्रह्माचे वर्णन आले होते. ते सर्वत्र व्याप्त आहे. परंतु त्याचा अनुभव येण्यासाठी या अध्यायात दहरविद्या सांगितली आहे. दहर म्हणजे अल्प (लहान). विश्वामध्ये जसे अनन्त आकाश आहे, तसेच हृदयातील दोन नलिकांमध्ये एक पोकळी आहे. त्यात लहानसे आकाश आहे. त्यात आत्मा रहातो. साधनेने / गुरुकृपेने त्याचे दर्शन घेता येते.

हरिः ॐ अथ यद् इदम् अस्मिन् ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म दहरोऽस्मिन् अन्तराकाशः तस्मिन् यत् अन्तः तत् अन्वेष्टव्यं तद् वाव विजिज्ञासितव्यम् इति ॥१॥

राजाचे जसे पुर असते तसे हे शरीर आत्म्याचे नगर आहे. इंद्रिये, मन, बुद्धि हे त्या आत्म्याच्या सेवेसाठी इथे रहतात. राजधानीमध्ये राजाचा महाल असतो, तसे शरीरातही आत्म्याचे रहाण्याचे ठिकाण कमळाच्या आकाराचे सूक्ष्म (दहर) आहे. या हृदयरूपी कमळाच्या आतील सूक्ष्म पोकळीला दहराकाश म्हणतात. त्याला शोधायला हवे. त्याविषयी जिज्ञासा हवी.



तं चेत् ब्रूयुः यद् इदम् अस्मिन् ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म दहरः अस्मिन् अन्तराकाशः किं तत् अत्र विद्यते यत् अन्वेष्टव्यम् यत् वाव विजिज्ञासितव्यम् ? स ब्रूयात् ॥२॥

गुरुजवळ जाऊन शिष्यांनी विचारले, या ब्रह्मपुरात जे सूक्ष्म कमळाकार गृह आहे, त्यात सूक्ष्म से दहराकाश आहे त्यात काय असते ज्याचा आम्ही शोध घ्यायला हवा?

© www.madhavveeraghuveer.com

!! Shree !! With Best Compliments From !! Jai Bajrang !! Mob : 9921181809

ग्रीष्म रक्त पेटविणारा सुधीर मोघे
शिशिर आग गोठविणारा
कोमेगाने मेळविणारा फुलारी वसंत
अरवपास पाहे रुपी
तोचि भाग्यवंत । निसर्गात मरीने राहे

OCTOBER **14** MONDAY

आश्विन शु. १० संवत २०६९
सोमवार १४/१०/२०१३

| SEPTEMBER 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

अनादि अनंत
ज्याबद्दल जिज्ञासा ठेवायला हवी त्याबद्दल आम्हाला सांगा.
शिष्याने विचारल्यावर सांगावे असा संकेत आहे.
जिज्ञासा; युयुत्सा, विजिगीषा, पिपासा - इच्छित होते.
अन्वेषण - शोध घेणे - अनु + इष (पाठोपाठ जाणे)
मागोवा घेणे. To seach after, seeking for,
तत्त्वान्वेषी, छिद्रान्वेषी

यावान्वा अयमाकाशस्तावानेषोऽन्तर्हृदय आकाश उभे अस्मिन् द्यावापृथिवी अन्तरेव समाहिते । उभौ अग्निः वायुः च सूर्याचन्द्रमसौ उभौ, विद्युत नक्षत्राणि यत् च अस्य इह अस्ति यत् च न अस्ति सर्व तत् अस्मिन् समाहितम् इति ॥३॥

कालातीत
यावान - तावान । अंत:करणरूपी आकाश सूक्ष्म आहे हे खरे परंतु जितके बाहेरचे (भौतिक) आकाश आहे तितकेच हे आंतील आकाश आहे. याही आकाशात स्वर्ग, पृथ्वी सामावलेली आहे. त्याचे अग्नि, वायु, सूर्य, चंद्र, वीज, नक्षत्र हे सर्व इथे आहे. जे जे भौतिक आकाशात आहे, ते ते सर्व इथे आहे. जे इथे नाही ते तिथे ही नाही.
जे पिंडी ते ब्रह्मांडी । Replica प्रतिकृती.
एका लहानशा Pendrive मध्ये मोठ्या गोष्टी सामावलेल्या असतात. एका लहानश्या सिम कार्ड मध्ये सर्व data असतो.
आत्मा ज्याज्या रूपात बाहेर दिसतो ती सर्व रूपे या हृदयाकाशात स्थित आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

कधी पावसाच्या धारा । क्षणाक्षणात केव्हा वारा । प्रहरेस होऊन तारा । हसे रूपवंत ।



[illegible] ... आले । सर्व [illegible] ॥

Q-TDS return
PF payamnt

तं चेत् ब्रूयुः चेत् अस्मिन् इदं ब्रह्मपुरे सर्वं समाहितं सर्वाणि च भूतानि सर्वे च कामाः यद एतत् जरा वा आप्नोति प्रध्वंसते वा किं ततः अतिशिष्यते ।।४।।

शिष्य आचार्यांना विचारतात - या ब्रह्मपुरातील आकाशात सर्वच जर समाविष्ट झाले असतील - सर्व भूते, सर्व कामना तर मग जेव्हा या देहाला म्हातारपण येते किंवा हे शरीर नष्ट होते तेव्हा तिथे मग काय उरते?

जसे घट फुटला की त्यातील दही, दूध सांडून जाते, तसे काही इथे होते का?

सः (आचार्यः) ब्रूयात् न अस्य (देहस्य) जरया एतत् जीर्यति न अस्य वधेन ~~हन्यते~~ हन्यते। एतत् सत्यम् ब्रह्मपुरम्। अस्मिन् कामाः समाहिताः एषः आत्मा अपहतपाप्मा विजरः विमृत्युः विशोकः विजिघत्सः अपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः। यथा हि एव इह प्रजाः अन्वविशन्ति यथानुशासनं यं यम् अन्तम् अभिकामाः भवन्ति यं जनपदं यं क्षेत्रभागं तं तम् एव उपजीवन्ति॥

आचार्य म्हणाले - देहाला वार्धक्य आले तरी दहराकाशातील आकाश नावाचे ब्रह्म वृद्ध होत नाही. किंवा शरीराचा वध झाल्याने संपत नाही। हे ब्रह्मपुर नित्य सत्य आहे. त्यात सर्व काम सम्यक् रूपाने स्थित आहेत. शरीरात तेच ब्रह्म आहे. ∴ शरीरालाही ब्रह्मपुर म्हटले आहे.

आत्मा हेच खरे स्वरूप आहे. त्याचे सर्व पाप नष्ट (अपहतपाप्मा) झाले आहे. त्याला धर्माधर्म नाही.

© www.madhaveeraghuveer.com

स्फटिकाशेजारी जास्वंदीचे फूल / व्हेल्वेट कापड

OCTOBER **16** WEDNESDAY

आश्विन शु. १२/१३ संवत २०६९ बुधवार १६/१०/२०१३

बकरी ईद

| SEPTEMBER 2013 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| S | M | T | W | T | F | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

Desire to eat
विजिघत्सा - Hungry

त्याला जरा/वार्धक्य नाही. मृत्यु/शोक नाही. भूक/तहान नाही. तो सत्यकाम सत्यसंकल्प आहे. प्रापंचिकांच्या कामना असत्य असतात परंतु आत्मा प्रकाश असल्याने त्याच्या कामना सत्यच असतात. ∴ त्यांचे संकल्प देखील सत्य, शुभ असतात.

जगात यथा राजा तथा प्रजा असा नियम आहे. अन्वविश्वानि - पाठोपाठ प्रवेश करतात. अनुसरण

या ब्रह्मपुरीतील राहणारे जर आत्म्याला ओळखून आपले वर्तन ठेवतील तर त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतील.

Individual will should be merged into Cosmic will.

आत्म्याला जरा नाही. कारण त्याच्याकडे शरीर दुरुस्त करण्याची शक्ती आहे. Auto repairing.

शरीराचे कितीतरी रोग आपोआप बरे होतात. जिभेला झालेली जखम लवकर बरी होते। सर्दी---

तद् यथा इह कर्मजितः लोकः क्षीयते एवम् एव अमुत्र पुण्यजितो लोकः क्षीयते। तत् ये इह आत्मानम् अननुविद्य व्रजन्ति एतान् च सत्यान् कामान् तेषां सर्वेषु लोकेषु अकामचारः भवति। अथ ये इह आत्मानम् अनुविद्य व्रजन्ति एतान् च सत्यान् कामान् तेषां सर्वेषु लोकेषु कामचारः भवति।

त्याप्रमाणे इथला कर्माने जिंकलेला लोक क्षीण होतो त्याप्रमाणे परलोकातील पुण्याने जिंकलेला लोक क्षीण होतो. जे लोक या मृत्युलोकात (या शरीरात) असताना सत्यकामांना न जाणताच जातात त्यांना सर्वत्र स्वेच्छेने संचार करता येत नाही मात्र जाणणारे सर्व लोकांमध्ये स्वेच्छेने संचार करतात

With Best Compliments From
A. R. Deo
Kreative Developers
108, 1st Floor, ABC Nirman, Laxman Nagar, CTS 2752, Survey No. 40, Thergaon, Pune - 411 033.
Email : deo_ashutosh@hotmail.com
Mobile : +919822020717

जो आत्म्याला जाणतो त्याला विशेष फळ मिळते. मुक्तसंचार मिळते

© www.madhaveeraghuveer.com

५ नोव्हेंबर २०२२



द्वितीय खण्ड -

स यदि पितृलोककामो भवति संकल्पादेवास्य पितरः समुत्तिष्ठन्ति तेन पितृलोकेन संपन्नो महीयते ॥१॥

१) जिवंतपणी आत्म्याला व सत्य कामनांना जो जाणतो, त्याने देह पतनानंतर ज्या लोकाची कामना करावी, त्या त्या लोकातील पितृगण तिथे उपस्थित होतात. ते त्याचे स्वकीय होतात. तो पितृलोकात समाविष्ट होऊन महिमान्वित होतो. तेथील सर्व भोग त्याला मिळतात.

याप्रमाणे त्याला मातृलोक (२), भ्रातृलोक (३), स्वसृलोक (४), सखिलोक (५) प्राप्त होतो. ते सर्व उपस्थित होतात. केवळ संकल्पानेच त्याला तेथील सर्व भोग प्राप्त होतात.

६) अथ यदि गन्धमाल्यलोककामो भवति संकल्पादेवास्य गन्धमाल्ये समुत्तिष्ठतः । तेन गन्धमाल्येन सम्पन्नो महीयते ॥

त्याच्या संकल्पाने त्याला गंधमाला, सुगंधित द्रव्ये, फुले, पुष्पमाला इ. साहित्य त्याच्यासाठी समोर असते. तो तेथील सर्व भोग प्राप्त करून महिमा प्राप्त करतो.

७) याचप्रमाणे अन्नपानाची कामना - खाद्यपदार्थ व पेये ~~जर~~ उपलब्ध होतात.

८) जर गीतवादनलोकामध्ये रुचि - गीतवाद्याने संपन्न.

९) जर स्त्रीलोकाची कामना - सुंदर स्त्रिया व भोग

१०) ज्या ज्या प्रदेशाची इच्छा करतो ते ते केवळ संकल्पाने प्राप्त होतात. त्या त्या लोकातील भोगामुळे संपन्न होतो. मोठा ठरतो । तो कामचार - मुक्त संचार करू शकतो.

© www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From
GOVIND HALWAI CHOWK
250/251, MAHATMA GANDHI

१७ नोव्हेंबर २०२२



तृतीय खण्ड

त इमे सत्याः कामा अनृतापिधानास्तेषां सत्यानां सतामनृतमपिधानं यो यो ह्यस्येतः प्रैति न तमिह दर्शनाय लभते।

त्या ह्या सत्यकामना मिथ्यारूप आच्छादनाने झाकलेल्या असतात. या जगातील वस्तू / व्यक्तींसाठी ज्या वेळी तृष्णा असते त्यामुळे होणारा आचार मिथ्याजनित असते। ज्यात विकार नाही ती सत्यकामना! त्याने लौकिक हित साधता येते. असा सत्यकाम सर्व लोकात मुक्तसंचार करू शकतो. परंतु त्याच्या इच्छा नश्वर विषयांबद्दल असल्याने तो जातो तो कायमचाच! त्याचे पुन्हा दर्शन घडत नाही.

प्र + इति – प्रेत – परत कधीही येत नाही. आसक्ती सत्यापासून दूर नेते. ती सत्यावर झाकण घालते. त्या आसक्तीमुळे मन, इंद्रिये तिथे गुंतून पडतात. अशा वेळी कामना सत्य रहात नाही, म्हणून मेल्यावर ते विषय / लोक पहाता येत नाहीत.

अथ ये चास्येह जीवा ये च प्रेता यच्चान्यदिच्छन्न लभते सर्वं तदत्र गत्वा विन्दतेऽत्र ह्यस्यैते सत्याः कामा अनृतापिधानास्तद्यथापि हिरण्यनिधिं निहितमक्षेत्रज्ञा उपर्युपरि सञ्चरन्तो न विन्देयुरेवमेवेमाः सर्वाः प्रजा अहरहर्गच्छन्त्य एतं ब्रह्मलोकं न विन्दन्त्यनृतेन हि प्रत्यूढाः ॥२॥

जे त्या त्या लोकात आपल्या जीवित वा मृत नातेवाईकांना भेटू शकत नाहीत किंवा ज्या पदार्थांची इच्छा करूनही ते प्राप्त करू शकत नाहीत, त्या सर्वांना तो इथे हृदयाकाशा



© www.madhaveeraghuveer.com

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।



स्थित ब्रह्मात जाऊन प्राप्त करून घेतो - माणसाचे ज्ञान हे अविद्येने झाकलेले असते. (अनृतापिधान)

सुवर्णनिधि पुरून ठेवलेल्या जमिनीविषयी माहिती नसल्यास वरून लोक संचार करतात परंतु त्यांना निधि प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे अज्ञानी लोक निद्राकाळी हृदयातील ब्रह्मलोकात जातात तरीपण त्यांना आत्म्याची प्राप्ती होत नाही. कारण अविद्येच्या भ्रमात असल्याने ती मागे खेचत असते.

प्रश्नोपनिषद - प्रश्न - ४ - मनुष्य निद्रावश होतो तेव्हा स्थूल इंद्रिये - सूक्ष्म इंद्रियात (गोलक - Centres) प्रवेश करतात. Head Office - Reporting - सूक्ष्म इंद्रिये मनामध्ये प्रवेश करतात. मन स्वप्नसृष्टी उभी करते. त्यात ते सर्व क्रिया करत असते. जेव्हा मनही गाढ झोपते, तेव्हा ते उदान वायूने हृदयापर्यंत ढकलले जाते. या हृदयातच परब्रह्माचा वास (कार्यालय - Office) असतो. परंतु अविद्येने आवृत असल्याने त्याला हे कळत नाही. वस्तुतः निद्रेने मिळणारा आनंद ब्रह्मानंदसदृश असतो. तो दररोज ऊर्जा पुरवतो. तो

SUNDAY, OCTOBER 20 आश्विन कृ. २ संवत २०६९

मिळाला नाही तर मनुष्य अस्वस्थ होतो. गुन्हेगाराकडून सत्य वदवून घेण्यासाठी पोलिस त्यांना निद्रेपासून वंचित ठेवतात. रात्रपाळी करणाऱ्यांचे मन अस्थिर असते. निर्णय घेता येत नाही.

अतृप्त इच्छा कधी स्वप्नात पूर्ण होतात. तर पुष्कळदा त्यांची स्वाभाविक पूर्तता या हृदयाकाशातील ब्रह्मात होत असते. कारण वस्तू (व्यक्ती) ही आत्म्यामध्येच केवळ रूपे असतात. त्यामुळे हृदयस्थाला शरण की त्या सर्वांना भेटल्यासारखेच होते. परंतु अज्ञानाने हे समजत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From
Water Suppliers

म्हणून तर छेदले जाते; त्या एकाला जाणले की सर्वांना जाणल्यासारखेच होते.

यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।

सर्व आनंद / समाधान आत्म्यापाशीच आहे.
आणि तो हा आत्मा हृदयातच असतो. आणि हे जाणणारा दररोज स्वर्गाला जात असतो.

(लक्ष्मी) हृदि अयम् -

स वा एष आत्मा हृदि तस्यैतदेव निरुक्तं हृद्ययमिति। अहः अहः एवंवित् स्वर्गं एति॥३॥

अथ य एष सम्प्रसादोऽस्मात् शरीरात् समुत्थाय परं ज्योतिरुपसम्पद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यत एष आत्मेति होवाच एतदमृतमभयमेतद् ब्रह्मेति तस्य ह वा एतस्य ब्रह्मणो नाम सत्यमिति॥४॥

सम्प्रसाद - सुषुप्तिकाळी आत्म्याशी जोडला गेल्याने हा सम्यक् रीतीने प्रसन्न होतो. आणि मग तो अस्मात् शरीरात् उत्थाय — या शरीरातून उठून — देहात्मबुद्धि टाकून — परमज्योतिला प्राप्त करून घेतो, म्हणजेच स्वरूपाची प्राप्ती होते. त्याला ज्ञान होते की हाच आत्मा, अमृत, हाच अभय आहे. हेच ब्रह्म आहे. हृदयाकाशात राहणाऱ्या त्या ब्रह्माचे नाव (सत्य)

तानि ह वा एतानि -------- एवंवित्स्वर्गं लोकमेति।

सत्यम् - सत् + यम्
सकार - अमृत
तकार - मर्त्य
यम - नियमन करणारा

सदसच्यामधून - परस्परविरोधी भासत असले तो एकरूप आहे



© www.madhaveeraghuveer.com

१८ नोव्हेंबर २२

NOVEMBER 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

अंगारक संकष्ट चतुर्थी

आश्विन कृ. ३ संवत २०६९
मंगळवार २२/१०/२०१३

OCTOBER 22 TUESDAY

चतुर्थ खण्ड

अथ य आत्मा स सेतुः विधृतिः एषां लोकानाम् असम्भेदाय न एतं सेतुं अहोरात्रे तरतः न जरा न मृत्युः न शोको न सुकृतं न दुष्कृतं सर्वे पाप्मानः अतः निवर्तन्ते अपहतपाप्मा ह्येष ब्रह्मलोकः।

आत्मा हा सेतुरूप आहे. मनामनांमध्ये पूल बांधण्याचे काम हा करतो. सृष्टीत विविधता आहे. वर्ण, आश्रम, देश, काळ, रंग, रूप असे भेद त्यानेच धारण केले आहेत. त्यामुळेच ते संघर्ष न करता टिकून आहेत.

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा॥

वरवरच्या रंगरूपाला बळी भुलणारे वर्णभेदाचे बळी ठरतात. सर्वांची तहानभूक, अपत्यप्रेम, काळजी सारखीच आहे. प्रेमभावना, देहवासना समानच आहे.

हा आत्मा (सेतु) वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यावर काळाचा परिणाम होत नाही. जरा, मृत्यु, शोक, पुण्य, पाप यांचा परिणाम होत नाही. सर्व पापे इथून निवर्तित होतात. आत्मा केवळ शक्ती पुरवतो. तो कशानेही लिप्त होत नाही.

तस्माद्वा एतं सेतुं तीर्त्वा ------ सकृद्विभातः हि एषः लोकः

या सेतुपर्यंत जो पोहोचतो त्याला डोळे नसले तरी तो आंधळा नसतो. (सूरदास, गुलाबराव महाराज)

अन्धः सन् अनन्धः भवति। विद्धः सन् अविद्धः) तापी सन् अनतापी भवति। तीर्त्वा अपि नक्तम् अहः (रात्रीचा दिवस) अभिनिष्पद्यते। हा ब्रह्मलोक सर्वदा प्रकाशस्वरूप असतो।

© www.madhavaghuleer.com

आत्म्याचा आधार प्राप्त झाला की देहाची सुखदुःखे बाधित नाहीत. रमण महर्षि - भूल न जाना शब्द क्रिया। कबीर - कना जाने चमडी जाने। स्वामीजी सहकारी - गर्व। इन्द्रियाणि इन्द्रियार्थेषु वर्तन्ते।

तद् ये एव एतं ब्रह्मलोकं ब्रह्मचर्येण अनुविन्दन्ति तेषाम् एव एषः ब्रह्मलोकः तेषां सर्वेषु लोकेषु कामचारो भवति।

ब्रह्मचर्याचे पालन करून जे ब्रह्मलोकाला जाणतात त्यांना सर्व लोकांमध्ये इच्छेनुसार संचार करता येतो.

इंद्रियसंयम, अनासक्ती, श्रद्धा / साधनचतुष्टयाच्या प्रमाणे आचरण करणाऱ्यांना शास्त्रविहित मार्गावरून चालणाऱ्यांना ब्रह्मलोक प्राप्त होतो.

© www.madhaveeraghuveer.com

पंचमः खंडः।

अथ यत् यज्ञः इति आचक्षते ब्रह्मचर्यम् एव। तद् ब्रह्मचर्येण हि एव यः ज्ञाता स (ब्रह्मलोकम्) विन्दते अथ यत् इष्टम् इति आचक्षते सत् ब्रह्मचर्यम् एव। ब्रह्मचर्येण हि एव इष्ट्वा आत्मानम् अनुविन्दते ॥५॥

इष्टि - यज्ञ। ब्रह्माच्या प्राप्तिसाठी जे आचरण केले जाते ते ब्रह्मचर्य। — इंद्रियसंयमन, मनःसंयम, विरक्ती, गुरूपदेशाचे पालन। यज्ञाने स्वर्गप्राप्ति होते अशी श्रद्धा होती. ब्रह्मचर्यपालन हाही यज्ञच आहे. जनकल्याणासाठी, निःस्वार्थपणे कार्य करणे हाही यज्ञच आहे. वृक्षारोपण, रक्तदान, पाणपोया, धर्मशाळा, रस्ते ही यज्ञाचीच रूपे आहेत. यज्ञाने सृष्टीची झीज भरून काढली जाते. निसर्गाचे शोषण नको तर दोहन हवे. (सोन्याची अंडी देणारी कोंबडी)
यज्ञामागील भावना पूजनाची, त्यागाची, ईश्वरप्राप्तीची

अथ यत् सत्रायणम् इति आचक्षते ब्रह्मचर्यम् एव। तद् ब्रह्मचर्येण हि एव सतः आत्मनः त्राणं विन्दते। अथ यत् मौनम् इति आचक्षते ब्रह्मचर्यम् एव। तद् ब्रह्मचर्येण हि एव आत्मानम् अनुविद्य मनुते॥

सत्र – अनेक दिवस चालणारा यज्ञ। सत्रायण हेही ब्रह्मचर्यच मानावे, कारण यज्ञ। इष्टाने तसेच ब्रह्मचर्याने परमात्मप्राप्ती होते. ब्रह्मचर्यामुळेच सत् कडून आपले संरक्षण होते. मौन हेही ब्रह्मचर्यच आहे. कारण त्यामुळेच परमात्मा जाणून त्याचे मनन केले जाते. ध्यान केले जाते.

© www.madhaveeraghuveer.com

मौनाने वृत्ति अंतर्मुख होते. आत्मसंवाद साधला जातो.

अथ यद् अनाशकायनम् इति आचक्षते तदेव आत्मा न नश्यति यं ब्रह्मचर्येण अनुविन्दते। अथ यत् अरण्यायनं इति आचक्षते ब्रह्मचर्यम् एव। तत् अरः च ह वै ण्यः च अर्णवौ ब्रह्मलोके तृतीयस्याम् इतः दिवि तत् ऐरं मदीयं सरः। तत् सोमसवनः अश्वत्थः। तत् ब्रह्मणः अपराजिता पूः प्रभुविमितं हिरण्मयम्।

अनाशकायनम् - अनशन - उपवासाकडे, मिताहाराकडे कल असणे हेही एक प्रकारचे ब्रह्मचर्यच आहे.
जे ब्रह्मचर्याने राहतात ते नष्ट होत नाहीत. त्यांना आत्मप्राप्ति होते.

© www.madhaveraghuveer.com

षष्ठः खण्डः

त्याचे आचरण ब्रह्मप्राप्तिसाठी असते. त्याच्या व्यवहारातील सर्व क्रिया ब्रह्माशी सुसंगत / सजातीय असतात. त्याच्या सर्व व्यापारांची दिशा ब्रह्माकडेच असते. त्याला संसारातील गोष्टींची इच्छा उरत नाही. त्याच्या तिन्ही एषणा सरलेल्या असतात. वित्तैषणा, दारैषणा, लोकैषणा। त्याचे प्रत्येक कर्म परमेश्वराशी जोडलेले असते.

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहम्।
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः।
संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो।
यद्यद् कर्म करोमि तत्तदखिलं शम्भो तवाराधनम्॥

असा योगी पुरुष अनन्य भावाने परमेश्वर चिंतन करत असतो. तो हृदयकमलातील ब्रह्माची उपासना करतो.

अथ या एता हृदयस्य नाड्यः ताः पिङ्गलस्य अणिम्नः तिष्ठन्ति। शुक्लस्य, नीलस्य, पीतस्य, लोहितस्य इति असौ वै आदित्यः पिङ्गलः एषः शुक्लः एषः नीलः एषः पीतः एषः लोहितः।

सूर्यापासून जशी त्याची किरणे प्रसरण पावतात तशा हृदयापासून अणिमा एवढ्या सूक्ष्म



रसाच्या नाड्या बाहेर पडतात. आदित्य मुळात पिंगळ वर्णाचा निळा, शुक्ल, पिवळा, लाल आहे. तशाच या नाड्या विविध वर्णांच्या असतात. हृदयातून १०० नाड्या व एक मुख्य नाडी बाहेर (सुषुम्ना) पडते. या सर्व नाड्या सूर्याच्या किरणांकडून ऊर्जा ग्रहण करतात. म्हणून दररोज सकाळी Fresh, उत्साही, तरतरीत वाटते व अंधार पडू लागला की मरगळ येते.

With Best Compliments From
Water Suppliers

उत्तम आरोग्य : यथाकाळी भूक लागणे, अन्नपचन होणे



शांत निद्रा | शुभ भावना | स्मरण
कृतज्ञता | वाणीची शुचिता |
देहाची लवचिकता | स्वावलंबन |
नि:स्वार्थीपणाने कार्य



तद् यथा महापथः आततः उभौ ग्रामौ गच्छति इमं च अमुं च एवम् एताः आदित्यस्य रश्मयः उभौ लोकौ गच्छन्ती इमं च अमुं च अमुष्मात् आदित्यात् प्रतायन्ते ता आसु नाडिषु सृप्ता आभ्यो नाडिभ्यः प्रतायन्ते ते अमुष्मिन आदित्ये सृप्ताः ॥२॥

Highway जसा जवळच्या व दूरच्या दोन्ही गावांना जातो. तशी सूर्याची किरणे पृथ्वीवरही पोहोचतात व तसेच आदित्यातही असतात. सूर्याच्या किरणांमधून येणारी ऊर्जा या नाड्यांमध्ये भरली जाते.

तद् यत्र एतत् सुप्तः समस्तः सम्प्रसन्नः स्वप्नं न विजानाति तदा आसु नाडिषु सृप्तः भवति तं न कश्चन पाप्मा स्पृशति तेजसा हि तदा सम्पन्नः भवति ॥३॥

स्थूल इंद्रिय — सूक्ष्म इंद्रिये — मन — स्वप्नसृष्टी
→ सुषुम्ना नाडी — उदानवायू वळतो — गाढ झोप,

उदान वायु हळूहळू हळूहळू मनाला हृदयाजवळ नेतो तिथे आत्म्याच्या सान्निध्याने तो प्रसन्न होतो. जो गाढ झोपेचा अनुभव घेतो, त्याला स्वप्ने पडत नाहीत. मनाचे व्यापार थांबले असतात. बाह्य जगाशी संबंध सुटलेला असतो. अशा वेळी कोणतेही पाप त्याला स्पर्श करत नाही. अशा वेळी तो तेजाने व्याप्त असतो. त्यावेळी त्याला सत्‌ची प्राप्ती झालेली असते.

झोपेची गोळी नको

*With Best Compliments From*

© www.madhaveeraghuveer.com

अथ यत्र एतद् अबलिमानं नीत: भवति तम् अभित: आसीना: आहु: जानासि माम् जानासि माम् इति। स: यावत् अस्मात् शरीरात् अनुत्क्रान्त: भवति तावत् जानाति।

व्याधि जराजर्जर झालेला मनुष्य दुर्बल होऊन अंथरुणावर पडलेला असतो त्या आसपास बसलेले विचारतात मला ओळखले का? मी कोण? जोपर्यंत आत्मा हे शरिर सोडून जात नाहि तोपर्यंत तो ओळखतो.

अथ यत्र एतद् अस्मात् शरीरात् उत्क्रामति अथ एतै: रश्मिभि: ऊर्ध्वम् आक्रमते। स: ओम् इति वा ह उत् वा मीयते स यावत् क्षिप्येत मन: तावद् आदित्यं गच्छति एतद् वै खलु लोकद्वारं विदुषां प्रपदनं निरोधो अविदुषाम्॥

जीव अंतकाळी शरीरातून निघून जातो तेव्हा आदित्याच्या किरणांनी वर वर जातो. तो ओंकाराचे ध्यान करीत वर जातो किंवा कर्मानुसार खाली जातो. मनाला जायला जितका वेळ लागतो तितक्या अल्प वेळात तो आदित्यलोकी जातो आदित्य हेच ज्ञात्यांचे ब्रह्मलोक प्राप्त करून देणारे द्वार आहे. जे आत्मज्ञानी नसतात त्यांना इथे विरोध होतो.

Airport - Passport, Security check-in.

अंतकाळी ओंकार/ईश्वर ध्यान होणे सोपे नाही. त्यासाठी जन्मभराची साधना हवी। अज्ञानी लोकांसाठी आदित्य



© www.madhaveeradhuveer.com

सत्याचे दार उघडत नाही म्हणनच प्रार्थना करायची.
हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्॥

तदेष श्लोकः। शतं चैका च हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानम् अभिनिःसृता एका। तयोः ऊर्ध्वम् आयन् अमृतत्वम् एति विष्वङ्ङन्या उत्क्रमणे भवन्ति उत्क्रमणे भवन्ति॥ ६॥

या शंभर नाड्या आणि एक या हृदयापासून निघतात. १००+१ असे म्हणण्याचे कारण ही एक प्रमुख आहे ती नाडी नसून मार्गिका आहे. ती सुषुम्ना नाडी म्हणून ओळखली जाते.
कुंडलिनी शक्ती जागृत होते तेव्हा ती याच मार्गिकेतून वर मस्तकात सहस्रारचक्रापर्यंत जाते. मस्तकावरील कवटीच्या तीन हाडांच्या त्रिकोणामध्ये एक मृदु भाग आहे. तिथे नंदद्वार (विद्रुति द्वार) आहे तिथून योग्याचा प्राण बाहेर पडतो. योगी पुरुषाचे शिष्य ते द्वार शंखाच्या टोकाच्या सहाय्याने उघडतात.
बाकीच्या शंभर नाड्या व त्यांच्या शाखांमधून बाहेर पडणारा जीव मात्र पुन्हा जन्ममरणाच्या चक्रात अडकतो. कारण या नाड्या उत्क्रमणाला कारण ठरतात.

© www.madhaveeraghuveer.com

२१ नोव्हेंबर २०२२



सप्तमः खण्डः ।

य आत्मापहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः स सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामान् यः तम् आत्मानं अनुविद्य विजानाति ।इति ह प्रजापतिः उवाच ॥१॥

विजिज्ञासितव्यः - जाणून घ्यायला हवे. कोणाला? जो आत्मा पापशून्य / दोषरहित, जरा नसलेला, मृत्यु नसलेला, शोकरहित., तहान भूक नसलेला, सत्यकाम सत्यसंकल्प आहे त्याला विशेषत्वाने जाणायला हवे.

सः अन्वेष्टव्यः ।

तं आत्मानं यः अनुविद्य विजानाति । - जो शास्त्र व गुरूंच्या उपदेशानुसार त्याला शोधून जाणतो. त्याला अप्राप्य काही राहत नाही. सर्व लोक प्राप्त होतात. सर्व इच्छा पूर्ण होतात.

नाम वाक्यविधात्यम -

तद् ह उभये देवासुराः अनुबुबुधिरे । ते ह ऊचुः (ब.व.) तम् आत्मानम् अन्विच्छामः यम् आत्मानम् अन्विष्य सर्वान् च लोकान् आप्नोति, सर्वान् च लोकान् । इन्द्रः ह देवानाम् अभिप्रवव्राज, विरोचनः असुराणां तौ ह असंविदानौ एव समित्पाणी प्रजापतिसकाशम् आजग्मतुः ॥२॥

अनुबुबुधिरे - परंपरेने कानावर आलेले (परोक्ष भूतकाळ)
अनुबुबुधिरे - | (अभिप्रवव्राज, आजग्मतुः) " "



© www.madhavweer.com

प्रजापतिच्या या बोलण्याला ऐकून देव व असुर यांना त्या आत्म्याला जाणण्याची इच्छा झाली. कारण त्याचे फलस्वरूप त्यांना सर्वत्र संचार व भोगप्राप्ति होणार होती.
त्या अपेक्षेने देवांचा राजा इंद्र व असुरांचा राजा विरोचन दोघेही ईर्ष्येने हातात समिधा घेऊन शरणभावाने प्रजापतिकडे गेले. आपले धन वैभव काहिही न घेता नम्रभावाने गेले.

तौ ह द्वात्रिंशतं वर्षाणि ब्रह्मचर्यम् ऊषतुः। तौ ह प्रजापतिः उवाच — किम् इच्छन्तौ अवास्तम इति। तौ ह ऊचतुः यः आत्मा अपहतपाप्मा विजरः विमृत्युः विशोकः विजिघत्सः अपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः सः अन्वेष्टव्यः सः विजिज्ञासितव्यः। यः तम् आत्मानम् अनुविद्य विजानाति सः सर्वान् च लोकान् आप्नोति, सर्वान् च कामान् इति। भगवतः वचः वेदयन्ते। तम् इच्छन्तौ अवास्तम इति ॥७॥

इंद्र व विरोचनाने प्रजापतींच्या आश्रमात बत्तीस वर्षे शुश्रुषा करून ब्रह्मचर्यपालन केले. अखेरीस जेव्हा प्रजापतींनी त्यांना येण्याचा हेतु विचारला तेव्हा त्या दोघांनी विशेषरूपाने आत्म्याला जाणून घेण्याविषयी सांगितले. कारण त्याला जाणले की सर्व भोग प्राप्त होतात आणि सर्वत्र संचार करता येतो.

तौ ह प्रजापतिः उवाच — यः एषः अक्षिणि पुरुषः दृश्यते एषः आत्मा। इति ह उवाच एतत् अमृतम् अभयम् एतत् ब्रह्म इति। अथ भगवः यः अयम् अप्सु परिख्यायते

©www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From

यः च अयम् आदर्शे कतमः एषः इति । एषः उ एव एषु सर्वेषु अन्तेषु परिख्यायते इति ह उवाच ॥४॥

प्रजापति म्हणाले - हा जो डोळ्यांमध्ये पुरुष दिसतो तो आत्मा आहे हाच अमृत, अभय, ब्रह्म आहे.

त्यावर इंद्र व विरोचन म्हणाले - हा जो पाण्यात सर्वत्र दिसतो व आरशात दिसतो त्यामधील नेमका आत्मा कोणता? त्यावर प्रजापति म्हणाले - मी ज्या नेत्रातील पुरुषाचे वर्णन केले तोच या सर्वांच्या आत सर्व बाजूंनी प्रतीत होत असतो.

अष्टमः खण्डः ।

उदशरावे (पाणी भरण्याजोगे मातीचे पसरट भांडे) आत्मानम् अवेक्ष्य यत् आत्मनः न विजानीथः तत् मे प्रब्रूतम् इति । तौ ह उदशरावे अवेक्षाञ्चक्राते । तौ ह प्रजापतिः उवाच किं पश्यथः इति । तौ ह ऊचतुः भगवः आवाम् इदं सर्वम् आत्मानं पश्याव, आलोमभ्यः आनखेभ्यः प्रतिरूपम् इति ॥१॥



प्रजापतीने त्या दोघांना मातीच्या परळात पाणी भरून त्यात स्वतःला बघायला सांगितले. आणि मग आत्म्यासंबंधी जे तुम्हाला समजणार नाही ते तुम्ही मला सांगा — असेही सांगितले.

तेव्हा त्या दोघांनी भरलेल्या परळात पाहून सांगितले की आम्ही यात समस्त आत्म्याला पहात आहोत. अगदी केसापासून नखापर्यंत सर्व काही आम्हाला दिसत आहे. कारण त्यांनी देहाला आत्मा मानलं



© www.madhaveeraghuveer.com

तौ ह प्रजापतिरुवाच------ किं पश्यथ इति ॥२॥

त्यांचे बोलणे ऐकून प्रजापतिने त्यांना अंगावर चांगले परिष्कृत व्हायला सांगितले. आधी वाढलेली दाढी नखे काढून टाका. स्नान करून शुचिर्भूत व्हा. मग उत्तम वस्त्रे, अलंकार घालून नटून थटून या आणि मग परातीत स्वत:ला पहा.

त्याप्रमाणे त्यांनी दाढी, नखे कापली. तेल, उटणे लावून स्नान केले. उत्तम वस्त्रालंकार घातले. व नंतर दोघांनी पाण्याने भरलेल्या परातीत पाहिले. तेव्हा प्रजापतीने विचारले — आता काय दिसते आहे ?

खरे तर आधीचे व आताचे रूप भिन्न आहे. ज्या गोष्टी वरवरच्या आहेत त्या येतात व जातात, त्या शाश्वत, टिकणाऱ्या नाहीत. आपला देहसुद्धा येतो व जातो तो चिरंतन नाही, बदलणारा आहे. म्हणूनच तो आत्मा नाही हे ~~स~~ प्रजापतिला दाखवून द्यायचे होते.

परंतु ते त्या दोघांना समजले नाही —

(३) --- प्रजापतीने विचारल्यावर त्यांनी वरवर दिसणारे दृश्य देहाचे वर्णन केले. उत्तम रीतीने परिष्कृत देह ---

प्रजापतिने ओळखले की हे बाह्य उपाधिनाच आत्मा समजत आहेत. नेत्रातील पुरुषाबद्दल मी जे काही बोललो होतो त्याविषयी हे काहीच बोलत नाहीत. यांना जास्त समजावण्यात अर्थ नाही. म्हणून प्रजापतिने 'हेच आत्मा, हेच अमृत, हेच अक्षय आहे.' असे सांगितले. तेव्हा आपल्याला आत्म्याचे, ब्रह्माचे ज्ञान झाले असे वाटून त्यांना आनंद झाला. आश्रमात काढलेली बत्तीस वर्षे सार्थकी लागली असे वाटल्याने ते शांत



© www.madhaveeraghuveer.com

NOVEMBER
5
TUESDAY

कार्तिक शु. २ संवत २०७०
मंगळवार ५/११/२०१३

भाऊबीज

| OCTOBER 2013 | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| S | M | T | W | T | F | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

घेऊन तेथून निघाले. प्रजापतिला मात्र खेद झाला.
(४) तौ ह अन्वीक्ष्य ---------- अवाप्नोतीइम च अमु च इति॥४॥

अशा प्रकारे आत्म्याला न जाणताच ते दोघे गेले. प्रजापतिच्या मनात आले - अशा प्रकारे जे कोणी देहालाच आत्मा मानतील ते पराभव पावतील. शरीराची उपासना करून कोणालाही श्रेयसाची प्राप्ति होणार नाही. कोणाचे भले होणार नाही.

दुसरीकडे आत्म्याचे ज्ञान झाले याचा आनंद झाल्याने प्रसन्नचित्त झालेला विरोचन असुरांकडे गेला आणि त्याने हे उपनिषद म्हणजे आत्मविद्या एकवली तो म्हणाला - या लोकी देह म्हणजेच आत्मा हाच पूजनीय, महान आहे. या देहाची परिचर्या, सेवा, उपासना करायला हवी. जे कोणी अशा रीतीने देहाची म्हणजेच पर्यायाने आत्म्याची पूजा करतील त्यांना इहलोक व परलोक प्राप्त होईल.

आणि तेव्हापासून देहाची उपासना आणि भौतिक भोगातच असुर रमू लागले.

आपले आजचे जीवन / संस्कृती पाहिली असता आपण असुरांपेक्षा निराळे नाही आहोत. आपल्या जीवनाला दैवी स्पर्श व्हायला हवा असेल तर दैवी सद्गुण / संपत्ति अंगी बाणवायला हवी तरच कदाचित् Life Divine चा अनुभव येऊ शकेल.

© www.madhaveeraghuveer.com

तस्मात् अद्य अपि हि अददानम् अश्रद्दधानम् अयजमानम् इति, असुरः बत । आहुः । असुराणां हि एषा उपनिषद् । प्रेतस्य शरीरं भिक्षया वसनेन, अलंकारेण इति संस्कुर्वन्ति ॥५॥

म्हणूनच आज या जगात असुरांची संख्या मोठी आहे. जो दान देत नाही, यज्ञ करत नाही श्रद्धा ठेवत नाही आणि केवळ शरीराचे चोचले पुरवण्यात मग्न असतो, त्याला राक्षसी म्हटले जाते. ही असली आत्मविद्या, हे तत्वज्ञान असुरांचेच असते. असे लोक मेलेल्या माणसाच्या प्रेताला देखील, शृंगारतात. भिक्षा, वस्त्र, अलंकाराने सजवतात. एवढे नसेल तर त्यासाठी कर्ज काढतात. कारण देहाची पूजा केल्याने परलोक जिंकता येईल असे त्यांना वाटते. अशाश्वताला शाश्वत रूप देण्याचा व्यर्थ अट्टाहास त्यांचा असतो आणि त्या नादात ते चिरंतनाकडे दुर्लक्ष करतात.

नवमः खण्डः ।

अथ ह इन्द्रः अप्राप्य एव देवान् एतत् भयं ददर्श । यथा एव खलु अयम् अस्मिन् शरीरे साधु अलङ्कृते साधु अलङ्कृतः भवति, सुवसने सुवसनः, परिष्कृते परिष्कृतः एवमेव अस्मिन् अन्धे अन्धः भवति, स्रामे स्रामः, परिवृक्णे परिवृक्णः । अस्य एव शरीरस्य नाशम् अनु एषः नश्यति ॥१॥

इंद्र अजून देवांपर्यंत पोहोचलाही नव्हता. वाटेतच त्याला भय भेटले. तेव्हा आपल्या विचारातील विसंगती / त्रुटी त्याला कळली.

©www.madhaveeragiriveer.com

TDS payment of Oct.



त्या पाण्यातल्या प्रतिबिंबाला आपण आत्मा समजलो ही आपली चूक आहे. कारण —

जेव्हा या शरीरावर अलंकार चढवले तेव्हा ते प्रतिबिंब / छायात्मा अलंकृत दिसले. तसेच ते परिष्कृत, सुवसन दिसले. त्याचप्रमाणे शरीराचे विकार प्रतिबिंबात उतरतील. प्रतिबिंब शरीराप्रमाणे — अंध, स्राम वा अपंग होईल. परंतु हे श्रेय नाही. कारण आत्मा तर अमर असतो असे म्हणतात. शरीर नष्ट झाले तर आत्मा नष्ट होईल आणि हे प्रजापतीच्या वचनाशी सुसंगत नाही. तेव्हा आपली कोठेतरी चूक होत आहे. असे वाटल्याने तो पुन्हा प्रजापतीकडे जाण्यासाठी निघाला.

नाहमत्र भोग्यं पश्यामि ------ नाहमत्र भोग्यं पश्यामि ॥ ॥२॥

इंद्राला वाटले या छायात्मदर्शनात काहीही मला भोग्य दिसत नाही. म्हणजे याने मला आत्मविद्या प्राप्त होणार नाही --- असा विचार करून तो परत फिरला. पुन्हा हातात समिधा घेऊन (शरणागत भावाने) प्रजापतीकडे आला तेव्हा प्रजापति त्याला म्हणाले ---

अरे, तू तर विरोचनाबरोबर संतुष्ट होऊन गेला होतास. आत्म्याला प्राप्त करण्याची तुझी जिज्ञासा पूर्ण झाली होती. मग आता का परत आलास ?

त्यावर इंद्राने मनातील विचार सांगितले — देहाला सालंकृत केल्याने सालंकृत, सुवसन, परिष्कृत होणारा हा छायात्मा किंवा अंध, स्राम, खंडित होणारा हा आत्मा, शरीर नष्ट होताच नष्ट होईल. यात काही मला भोग्य दिसत नाही. देह म्हणजे आत्मा नाही.

© www.madhaveeraghuveer.com

एवम् एव एष मघवन्निति ------ तस्मै उवाच॥३॥

प्रजापति म्हणाले, — बरोबर आहे तुझे! प्रतिबिंब किंवा देह म्हणजे आत्मा नाही - हा तुझा विचार योग्य आहे. मी तुला पुन्हा समजावून सांगेन. त्यासाठी तू इथे आणखी बत्तीस वर्षे ब्रह्मचर्य व्रताचे पालन करुन रहा. त्याप्रमाणे इंद्र प्रजापतिच्या आश्रमात आणखी बत्तीस वर्षे राहिला.

दशमः खण्डः।

य एष स्वप्ने महीयमानश्चरति एष आत्मा। इति ह उवाच एतत् अमृतम् अभयम् इति। एतत् ब्रह्म इति। सः (इन्द्रः) शान्तहृदयः प्रवव्राज। स ह अप्राप्य एव देवान् एतत् भयं ददर्श। तत् यद्यपि इदं शरीरम् अन्धं भवति अनन्धः स भवति। यदि स्रामम् अस्रामो भवति न एव एषः अस्य दोषेण दुष्यति॥१॥

प्रजापति म्हणाले — अरे, हा जो स्वप्नात पूजनीय असलेला विचरण करतो, तोच आत्मा आहे. तोच अमृत तोच अभय आहे. ब्रह्म आहे.

हे ऐकून शांतचित्त इंद्र तिथून निघाला परंतु वाटेत तो विचार करु लागला की हे काही योग्य नाही (इथे भय आहे.) या शरीराच्या अंध होण्याने स्वप्नशरीर अंध, काण, दूषित होत नाही. तरी हे काही योग्य नाही.

© www.madhaveeraghuveer.com

**NOVEMBER 9 SATURDAY**

कार्तिक शु. ७ संवत २०७०
शनिवार ९/११/२०१३

OCTOBER 2013

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

न वधेन अस्य हन्यते नास्य स्राम्येण स्रामो घ्नन्ति त्वैवैनं विच्छादयन्ति इव अप्रियवेत्ता इव भवति अपि रोदिति इवा न अहम् अत्र भोग्य पश्यामि इति॥ ॥२॥

प्रजापतिने सांगितलेल्या गोष्टींवर विचार करत इंद्र तिथून निघाला. हा स्वप्नात्मा शरीराची हत्या झाली तरी नष्ट होत नाही. शरीर मळणारे असले तरी तो मळत नाही. हे सर्व ठीक आहे

परंतु आचार्यांनी सांगितल्याप्रमाणे आत्मा अमृत, अभय आहे, तसे वर्णन इथे लागू पडत नाही. स्वप्नात याला कुणी मारते, दुःख भोगावे लागते, कधी तो त्रासतो, रडतो घाबरतो. मग हा अमृत अभय कसा काय? हे वर्णन योग्य वाटत नाही.

केन उपनिषदातील इंद्र विचार करणारा होता,

स समित्पाणिः पुनरेयाय - - - - - दोषेण दुष्यति ॥३॥
न वधेनअस्य हन्यते - - - - - - - - - तस्मै ह उवाच ॥४॥

**SUNDAY, NOVEMBER 10** कार्तिक शु. ८ संवत २०७०

इंद्राची जिज्ञासा अजूनही शमली नव्हती तो पुन्हा हातात समिधा घेऊन प्रजापतीकडे गेला, व त्याने त्याच्या मनातील शंका विचारल्या. त्यावर प्रजापति म्हणाले, की मी तुझ्यासाठी या ब्रह्मतत्वाची व्याख्या सांगेन म्हणजेच अन्य मार्गाने ब्रह्म समजावण्याचा प्रयत्न करीन. मात्र त्यासाठी तुला आणखी बत्तीस वर्षे इथे ब्रह्मचर्य व्रतात रहावे लागेल. त्याप्रमाणे इंद्रानेही शांतपणे आश्रमाचे सर्व नियम पाळले व त्याने बत्तीस वर्षे वास केला.

With Best Compliments From
LAKHIRAM NISHAD

© www.madhaveeraghuveer.com

एकादश: खण्ड: ।

तद् यत्र एतत् सुप्त: समस्त: सम्प्रसन्न: स्वप्नं न विजानाति एष: आत्मा' इति ह उवाच एतत् अमृतम् अभयम् एतद् ब्रह्म इति । स: शान्तहृदय: प्रवव्राज स:, ह अप्राप्य एव देवान् एतत् भयं ददर्श । नाह खलु अयम् एवं सम्प्रति आत्मानं जानाति 'अयम् अहम् अस्मि' इति । नो एव इमानि भूतानि विनाशम् (एव) अपीतो भवति । न अहम् अत्र भोग्यं पश्यामि इति ॥१॥ (इव)

गाढ झोपेत असणारा अतिशय चांगल्या तऱ्हेने आनंदित झालेला असतो. त्यावेळी तो स्वप्नही पहात नाही. हा आत्मा आहे. हा अमृत, अभय, ब्रह्म आहे.

आता आपल्याला ब्रह्म कळले या आनंदात इंद्र निघाला परंतु वाटेत त्याला भय दिसले. तेव्हा आपल्याला ब्रह्म कळले नाही हे ध्यानात आले. कारण गाढ झोपेत माणसाला स्वतःचेही भान नसते. शिवाय या भूतांचे, आजूबाजूच्या परिस्थितीचे भान नसते. खरं तर तो जणू विनाशास प्राप्त झालेला असतो।

किंबहुना निद्रेला दैनिक प्रलय / नित्य प्रलय म्हणतात. त्यामुळे हे ही इष्टफल / ज्ञान नाही, असे वाटते.

आतापर्यंत जागृती, स्वप्न — सुषुप्ती या अवस्थांचा विचार झाला. जागेपणी तर मीच सत्ता / देहाला जाणतो. स्वप्नावस्थेत देखील मीच मनाने स्वप्नसृष्टी उभारतो. ती सृष्टी वास्तव नसली तरी वास्तवाची प्रतिकृति असते. आणि गाढ झोपेत तर ही सृष्टी लयाला जाते. मग अशा वेळी मात्रेच भान नसते तर अभय, अमृत ब्रह्म कुठून कळणार?

©www.madhaveeraghuveer.com

स समित्पाणि: पुनरेयाय तं ह प्रजापतिरुवाच मघवन् यत् शान्तहृदयः प्राव्राजीः। किम् इच्छन् पुनः आगमः इति। ह सः (इन्द्र) उवाच, खलु अयं भगवः एवं सम्प्रति आत्मानं जानाति, अयम् अहम् अस्मि इति नो एव इमानि भूतानि विनाशम् एव अपीतो भवति। न अहम् अत्र भोग्यम् पश्यामि॥

इंद्र पुन्हा समित्पाणि होऊन प्रजापतिजवळ आला तेव्हा प्रजापती त्याला म्हणाले तू शान्तहृदय होऊन इथून गेला होतास. आता कोणती इच्छा घेऊन परत आलास? तेव्हा इंद्र म्हणाला, निद्रस्त असताना त्याला स्वतःचे किंवा इतरांचे भान नसते. अशा वेळी जणू काही त्याचा विनाशच झालेला असतो. यात मला तरी काही इष्टफळ दिसत नाही.

एवमेव एषः मघवन् इति ह उवाच। एतं तु एव ते भूयः अनुव्याख्यास्यामि नो एव अन्यत्र एतस्मात्। वस अपराणि पञ्च वर्षाणि इति। सः ह अपराणि पंच वर्षाणि उवाच। तानि एकशतं सम्पेदुः एतत् तत् यत् आहुः एकशतं ह वै वर्षाणि मघवान् प्रजापतौ ब्रह्मचर्यम् उवास॥

मघवन्, तू योग्य तेच बोलतोस. याच आत्म्याबद्दल मी तुला आता तरी स्पष्ट करून सांगतो. जागृती, स्वप्न, सुषुप्ति या तीन स्थितीमध्ये मी ज्या आत्म्याबद्दल सांगितले तोच हा आत्मा आहे. भिन्न नाही. आणखी पाच वर्ष येथे रहा.

थोडक्यात, इंद्राला देखील आत्मज्ञानासाठी एकशे एक वर्षे ब्रह्मचर्यवास साधावा लागला. ही सहजसाध्य गोष्ट नाही.

© www.madhaveeraghuveer.com

द्वादशः खण्डः।

मघवन् मर्त्यं वा इदं शरीरम् । मृत्युनात्तम् ।
तत् अस्य अमृतस्य अशरीरस्य आत्मनः अधिष्ठानम् ।
आत्तः वै सशरीरः प्रियाप्रियाभ्याम् । न ह वै
सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोः अपहतिः अस्ति ।
अशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः ॥ १ ॥

प्रजापती इंद्राला म्हणतात, मघवन् हे शरीर मर्त्य आहे. मृत्युने ग्रासलेले आहे. परंतु या अमृत अशरीरी आत्म्याचे ते अधिष्ठान आहे.

विनश्यत्सु अविनश्यन्तम् यः पश्यति सः पश्यति ।
विभक्तेषु अविभक्तम् ।

हा शरीरात्मा प्रिय-अप्रियाने वेढलेला आहे आणि जोवर शरीर आहे तोवर तो असणारच आहे. परंतु एकदा का अशरीर झाल्यावर मात्र या प्रियाप्रियाच्या स्पर्श होत नाही.

जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत नातेसंबंध, मी माझे, आवडी-निवडी आहेत. परंतु आत्मिक चैतन्याला कोणतीच आवड निवड नसते. प्रिय-अप्रिय नसते.

मरणान्तानि वैराणि - श्रीरामप्रभूने शत्रू रावणावर अंत्यसंस्कार केले (विधिवत) देह हे केवळ साधन आहे. आत्म्याचे रहाण्याचे स्थान आहे. त्याला योग्य तो मान जरूर द्यावा. परंतु त्यात गुंतू नये. देहाला मी समजू लागले तर गडबड होते.

त्यामुळेच इंद्राला व विरोचनाला 'देह' म्हणजेच मी वाटले. विरोचनाचे त्याने समाधान झाले परंतु इंद्राने त्यावर विचार केला तेव्हा त्याला त्यातील विसंगती जाणवली. तरीही प्रजापतिने इंद्राला विचार करण्यासाठी प्रवृत्त केले. व इतर मार्ग सुचवत राहिले. शेवटी मर्त्य शरीर निरळे



© www.madhaveeraghuveer.com

व आत्मा निराळा हे समजले. देहात राहूनही प्रयत्नाने, अनुभूतीने देहापेक्षा वेगळा होता येते. नारळाची करवंटी व खोबरं वेगळे आहे याची अनुभूती येते. अशा वेळी मनुष्य सुखदुःखापासून वर उठतो.

अशरीरो वायुरभ्रं विद्युत स्तनयित्नुः अशरीराणि।
तत् यथा एतानि अमुष्मात आकाशात समुत्थाय,
परं ज्योतिरूप सम्पद्य स्वेन रूपेण अभिनिष्पद्यन्ते।
॥२॥

स्तनयित्नुः मेघांचा गडगडाट.

या जगात प्रत्येकजण काही उद्देश घेऊन जन्माला येतो. तो पूर्ण होताच मूळ रूपाला जातो. उदा॰ वायू आदि.

वायुला हात, पाय, नाक, डोळे शरीर नाही. मेघाला नाही. वीजेला नाही. परंतु तेवढ्यापुरते ते येतात. कारण पाऊस पाडण्यासाठी ते निर्माण झालेले असतात. ते काम पूर्ण होताच आपल्या मूळ रूपाला प्राप्त होतात.

ही उदाहरणे देऊन प्रजापती स्पष्ट करत आहेत की देह वेगळा आणि तो चालवणारा वेगळा।

सुरुवातीला जागृती - स्वप्न - सुषुप्ति या अवस्था स्पष्ट करून त्या तिन्ही अवस्थांना चालवणारा, त्यात साक्षीभावाने राहणारा तो निराळाच आहे हे स्पष्ट केले.

यत् स्वप्नजागर सुषुप्तमवैति नित्यं
तद् ब्रह्म निष्कलमहं न च भूतसङ्घः॥

आता शरीराहून थोडे कमी स्थूल असणाऱ्या वारा, ढग, गडगडाट, वीज यांची उदाहरणे देऊन कार्यापुरते प्रकट होऊन पुन्हा मूळ स्वरूपाला जाणे - हे समजावत आहेत. विचारप्रवृत्त करतात — No spoon feeding.



© www.madhaveeraghuveer.com

एवमेव एष सम्प्रसादो अस्मात् शरीरात् समुत्थाय परं ज्योतिरुपसम्पद्य स्वेन रूपेण अभिनिष्पद्यते स उत्तमपुरुषः। स तत्र पर्येति (संचार करतो) सः तत्र जक्षन् क्रीडन् रममाणः स्त्रीभिः वा यानैः वा ज्ञातिभिः वा न उपजनं स्मरन् पर्येति, इदं शरीरं सः यथा प्रयोग्यः आचरणे युक्तः एवमेव अस्मिन् शरीरे अयं प्राणः युक्तः ॥३॥

जागृतीमध्ये शरीराचे पूर्ण भान असते.
स्वप्नावस्थेमध्ये शरीराचे नसले तरी अनुभवांचे, ज्ञानाचे भान असते. स्वप्नातून अनुभव घेतो.
सुषुप्तिमध्ये मात्र कशाचेही भान नसते. परंतु तरीही आत्म्याच्या सान्निध्यामुळे तो उत्तम प्रकारे प्रसन्न असतो.
सम्प्रसाद - ज्यावेळी स्वतःचे, भोवतालचे भान नसते. तेव्हा तो शुद्ध स्वरूपाच्या अगदी जवळ असतो. कुठल्याही नात्याचे, रंगाचे, पदवीचे, वयाचे, रूपाचे भान नसते. त्याचा देहात्मभाव पूर्ण गेलेला असतो अशा वेळी तो सम्प्रसाद स्थितीत असतो.

जागृतावस्थेत — स्थूल — अक्षिपुरुष
स्वप्नावस्थेत — सूक्ष्म — स्वप्नपुरुष
सुषुप्तावस्थेत — केवळ अस्तित्व — अशरीरी, अव्यक्त

गाढ निद्रेमध्ये स्वतःचे भान नसले तरी तो असतो हे मात्र निश्चित, नाहीतर तो मृत झालेला असता. मात्र तो प्रसन्नावस्थेत आहे, आत्मनिष्ठ आहे. त्यामुळे तो सर्वांच्या अंतरंगात प्रवेश करून सर्वत्र संचार करू शकतो. त्यावेळी तो ब्रह्म, चिद्घन, भूमा झालेला असतो.

© www.madhaveeraghuveer.com

With Best Compliments From

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

तो सर्वत्र संचार करू शकतो. हसू शकतो, अन्नसेवन करू शकतो. भोग घेऊ शकतो. स्त्रीसहवास, वाहन ज्ञातिबांधवांबरोबरच सुख भोगू शकतो. मंत्र अर्थ ॥ कारण त्याला शरीराचे भान नसते.

आज हृदय मन निःशंक झाले।
त्यात पाहुनी गगन ठेंगणे ॥

प्रयेण्य म्हणजे जोडलेला — घोडा बैल
आचरण „ चालणारा रथ किंवा गाडी.

जसे गाडी/रथाला बैल/घोडे ओढत असतात त्याचप्रमाणे शरीररूपी रथाला पंचप्राण, इंद्रिये, मन, बुद्धी ओढत असतात. मात्र आतला रथी सुखात बसलेला असतो. तो आनंद घेतो पण कोणत्याही क्रियेत अडकत नाही. तसाच हा सम्प्रसाद आनंदात असतो आणि देहाच्या सुखदुःखाकडे तटस्थतेने एक खेळ म्हणून पहात असतो.

अथ यत्र एतद् आकाशम् अनुविषण्णं चक्षुः स चाक्षुषः पुरुषः । दर्शनाय चक्षुः । अथ यः इदं जिघ्राणि इति वेद सः आत्मा । गन्धाय घ्राणम् ।



अथ यः अभिव्याहराणि इति वेद सः आत्मा । अभिव्याहाराय वाक् । अथ यः इदं शृणवानि इति वेद सः आत्मा । श्रवणाय श्रोत्रम् ॥ ४ ॥

या शरीरात इंद्रिये जी क्रिया करतात ती त्या आत्म्यामुळे करत असतात. निरनिराळ्या उपयोगासाठी निरनिराळी इंद्रिये असतात. म्हणून त्या इंद्रियांनाच आत्मा समजले जाते.

© www.madhavagniveer.com

!! Shree !! With Best Compliments From !! Jai Bajrang !! Mob : [illegible]

आत्मा जेव्हा डोळ्यातील बाहुलीत येतो तेव्हा डोळा बघू शकतो त्यावेळी त्याला चाक्षुषपुरुष म्हणतात.

आत्म्याला बघायची इच्छा होते त्यासाठी डोळा असतो. " वास घेण्याची इच्छा होते तेव्हा तो नाकात येतो. तो नाक बनतो. अभिव्यक्त होण्याची म्हणजे बोलण्याची इच्छा होते. तेव्हा तो वाणी बनतो. आत्म्याला जेव्हा ऐकावेसे वाटते तेव्हा तो कानात येतो म्हणजे कान बनतो.

अर्थातच ही सर्व इंद्रिये आपली आपण काहीच करू शकत नाहीत. त्या उपकरणांचा उपयोग करणारा उपस्थित असेल तरच ते उपकरण काम करते. त्यामुळे डोळ्यात जो पुरुष असतो तोच आत्मा असे म्हटले आहे.

यः एषः अक्षिणि पुरुषः दृश्यते एषः।

व्यवहारात देखील उपकरणांना चालवणारा उपस्थित असावा लागतो. देह हा देखील जड, अचल, निष्क्रिय आहे. त्याला चालवणारा वेगळाच आहे — (आत्मा)

त्यामुळेच देहाला आत्मा समजण्याची चूक होते. हीच चूक विरोचनाकडून व इंद्राकडून झाली. परंतु इंद्राच्या ते लक्षात आले व ती चूक समजावून घेण्यासाठी तो परत प्रजापतीकडे आला. प्रजापतीने त्याला विचारप्रवृत्त करण्यासाठी मुद्दामच आडवळणाने सांगितले होते.

गुरू हे कधीच ज्ञान उघड करत नाहीत. ते त्यावर आच्छादन / आवरण घालतात. शिष्याने प्रयत्नपूर्वक ते प्राप्त करायचे असते. हेच गुह्य ज्ञान।

© www.madhaveeraghuveer.com

अथ यः वेद इदं मन्वानि इति सः आत्मा मनः अस्य दैवं चक्षुः स वा एष एतेन दैवेन चक्षुषा मनसैतान कामान पश्यन रमते ॥५॥

आणि मग त्याला समजते की मी आता मनन करावे. तेव्हा तो विचार करणारा आत्मा होतो. मन हे त्या आत्म्याचे दिव्य चक्षु बनून मग तो आत्मा या दिव्य चक्षुने म्हणजेच मनाने भोगांना पहातो, अनुभवतो व त्यातच रममाण होतो.

उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः।

मनोरथ / मनातील मांडे असे ।। अनेक कथा आहेत. नेत्र हे शरीर असल्याने त्याच्या शक्तीला मर्यादा आहेत. परंतु मन मात्र अशरीरी असल्याने त्याला मर्यादा नाही. ते कोणत्याही कालातील, कोणत्याही स्थळातील भोग मनाने घेऊ शकते. आणि त्याने तृप्तीही मिळू शकते.

य एते ब्रह्मलोके तं वा एतं देवा आत्मानमुपासते तस्मान तेषां सर्वे च लोका आत्ताः सर्वे च कामाः स सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ह प्रजापतिरुवाच ॥६॥

जो हे ब्रह्मलोकातील भोग पाहून रमण करतो, त्या आत्म्याची सर्व देवगण उपासना करतात. म्हणून त्यांना सर्व भोग प्राप्त होतात. जो त्या आत्म्याला शास्त्र व आचार्यांच्या उपदेशानुसार साक्षातरूपाने अनुभवतो त्याला सर्व लोक व भोग प्राप्त होतात, असे प्रजापति म्हणाले.

©www.madhaveeraghuveer.com

त्रयोदश खण्ड

श्यामात शबलं प्रपद्ये । शबलात श्यामं प्रपद्ये । अश्वः रोमाणि इव पापं विधूय चन्द्रः राहोः मुखात प्रमुच्य शरीरं धूत्वा कृतात्मा अकृतं ब्रह्मलोकम् अभिसम्भवामि इति ॥१॥

श्याम रंगातील गोष्टी चटकन ध्यानात येत नाहीत. हृदयस्थ ब्रह्म हे गूढ असल्याने चटकन ध्यानात येत नाही. म्हणून त्याला श्याम म्हटले आहे. श्याम वर्ण हा सर्वसमावेशक आहे, सर्व वर्णांचे आश्रयस्थान आहे. या श्यामवर्ण हृदयस्थ ब्रह्माच्या आधारे त्या शबल (मिश्रित) ब्रह्माला प्राप्त करावे. कारण ब्रह्मलोकात -शुभ का होईना- वासना आहेतच. ते केवळ ब्रह्मापेक्षा थोडे हीण आहे - २३ कॅरट सोने।

नंतरच शबल ब्रह्मापासून श्याम ब्रह्माला प्राप्त करावे. Known कडून Unknown कडे जावे. ज्ञात → अज्ञात
स्थूल → सूक्ष्म सोपे → कठीण, गौण → प्रधान.

जीवन प्रथम सोपे — नंतर सहज → नंतर सुंदर करत गेले तर कठीण तत्त्वाचे आकलन होत जाते, मनाचे श्लोक — दासबोध — ज्ञानेश्वरी — गीता — उपनिषदे — वेद असे अध्ययन करावे.

हे शुद्ध ब्रह्म विश्वात ओतप्रोत भरून राहिले आहे परंतु त्यात स्फुरण, वासना, उपाधि मिसळल्याने त्याला शबलत्व आले. परंतु अर्थातच त्याची उत्पत्ति आहे ती शुद्ध ब्रह्मापासूनच आहे.

ज्याप्रमाणे घोडा अंग झटकन केसात अडकलेली धूळ दूर करतो त्याप्रमाणे मी उपाधि/वासनांमुळे मन चिकटलेली पापे झटकून टाकीन व शुद्ध होईन।

© www.madhaveeraghuveer.com

अशुद्धितून बाहेर पडलेली वस्तू झटकून उठते. राहूच्या मुखातून बाहेर पडलेला चंद्र पूर्वीचे शरीर टाकून कृतकृत्य होतो. त्याचप्रमाणे मीही हा देहभाव टाकून कृतकृत्य होऊन ब्रह्मलोकाला प्राप्त होईन.

देहबुद्धी टाकून आत्मबुद्धी जागणे यातच खरी देहाची सार्थकता आहे.

मानवी जीवनात अनेक कर्मे करावी लागतात. त्यातून पुढील जन्माचे बीज तयार होते. व या संसारचक्रात अडकावे लागते. परंतु कर्म करूनही त्या कर्माचा लेप लागू न देणे हेच तर कर्मातील कौशल्य आहे. आणि हीच कला गीता शिकवते.

कर्तृत्वाचा भाव न ठेवता, संग/आसक्ती मध्ये न गुंतता, फळाची इच्छा न ठेवता कर्म उत्तमरीतीने प्रामाणिकपणे, निःस्वार्थी भावनेने करत राहिले तर कर्म करूनही अशी नैष्कर्म्यता बाणता येते आणि मग अशी कर्मे Account ला जमा होत नाहीत अर्थातच अशा कर्माचा लेप लागत नाही. असा मानव शुद्धातिशुद्ध होतो. तो ब्रह्मलोकाला जातो. देहात असूनही तो विदेही होतो ब्रह्मस्वरूप होतो. हेच जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

चतुर्दश: खण्ड:

आकाशो वै नाम नामरूपयोर्निर्वहिता ते यदन्तरा तद्ब्रह्म तदमृतं स आत्मा प्रजापतेः सभां वेश्म प्रपद्ये यशोऽहं भवामि ब्राह्मणानां यशो राज्ञां यशो विशां यशोऽहमनुप्रापत्सि स हाहं यशसां यशः श्येतमदत्कमदत्कं श्येतं लिन्दु माभिगाम् ॥१॥

With Best Compliments From

© www.madhaveeraghuveer.com

पृथ्वी-आप-तेज-वायु-आकाश- या पंचमहाभूतां मध्ये आकाश हे सर्वात सूक्ष्म आहे. ते सर्वत्र भरून राहिलेले आहे. ब्रह्म हे त्याहिपेक्षा सूक्ष्म असलेले तरी उपनिषदांमध्ये ब्रह्माला अनेकदा आकाश म्हटले जाते. हा आत्मा नाम रूपाचे निर्वाह करतो. परंतु या नामरूपाच्या स्पर्श आतील आत्म्याला होत नाही. तो अक्रिय, अमूर्त, अरूप, अनाम आहे. त्याला वय नाही, आकार नाही, लिंग नाही, उच्च-नीच नाही. मात्र तरीही या सर्वांचा निर्वाह तो करतो.

शरीरात राहणारा, शरीर चालवणारा असूनही शरीराचे गुणदोष त्याला बाधत नाहीत. शरीर व्यंग युक्त असू शकते, मर्त्य असते परंतु आत्मा मर्त मर्त्य नाही. तो अशरीरी, अमृत, अजर आहे.

मी प्रजापतिच्या सभागृहाला प्राप्त करत आहे. मी यश नावाचा आत्मा आहे. मी ब्राह्मणांचे यश, क्षत्रियांचे यश, वैश्यांचे यश मीच आहे. मी यशांचे यश आहे. त्याची मला प्रचीति यावी. अर्थात मी या जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्त व्हावे.

पिकलेल्या बोराप्रमाणे लोहितवर्ण, दंतरहित असूनही भक्षण करणारे असे जे स्त्री योनि चिन्ह आहे. त्याला मी प्राप्त न व्हावे. अर्थात पुन्हा मला स्त्री योनिशी संपर्क नको. पुन्हा जन्म नको.

© www.madhaveerachuveer.com

पञ्चदशः खण्डः।

तद् एतद् ब्रह्मा प्रजापतये उवाच। प्रजापतिः मनवे मनुः प्रजाभ्यः। आचार्यकुलात् वेदम् अधीत्य यथाविधानं गुरोः कर्मातिशेषेण अभिसमावृत्य कुटुम्बे शुचौ देशे स्वाध्यायम् अधीयानः धार्मिकान् विदधत् आत्मनि सर्वेन्द्रियाणि सम्प्रतिष्ठाप्य अहिंसन् सर्वभूतानि अन्यत्र तीर्थेभ्यः स खलु एवं वर्तयन् यावत् आयुषं ब्रह्मलोकम् अभिसम्पद्यते। न च पुनरावर्तते न च पुनरावर्तते॥ ॥१॥

या उपनिषदातील अखेरच्या काही अध्यायात सांगितलेले हे जे आत्मज्ञान आहे - ते ब्रह्माने म्हणजेच हिरण्यगर्भाने प्रजापती कश्यपांना सांगितले. प्रजापतीने आपल्या पुत्राला म्हणजेच मनूला सांगितले,

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा
पुढे मनूने ते मद्भावा मानसा जाता येषां लोक
प्रजांना सांगितले इमाः प्रजाः॥

परंपरागत प्राप्त ज्ञानाचे महत्त्व विशेष असते. कारण त्या अनेक थोर विद्वानांच्या वाणीस्पर्श त्यांना



झालेला असतो. अनेक वर्षे काळाच्या कसोटीवर टिकलेले तत्त्वज्ञान उत्तम असते. प्रत्येक गुरु शिष्यांच्या जोडीबरोबर गुरुंचे तपः सामर्थ्यही संक्रमित होत असते आणि म्हणूनच परंपरेला विशेष महत्त्व आहे.

मंत्राचे सामर्थ्य तर असतेच परंतु ते Reproduce करताना त्या व्यक्तिच्या सात्त्विक स्पंदनांची जोड मिळत असते.